# कार्यक्रम अंदाजपत्रक

# 2018-19

# मराठी भाषा विभाग

अनुक्रमणिका


| कार्यक्रमाचा क्रमांक | कार्यक्रमाचे नाव | | | पृष्ठे |
|---|---|---|---|---|
| 1. | प्रस्तावना | .. | .. | |
| 2. | मराठी भाषा विभाग, मंत्रालय | .. | .. | |

| | | | |
|---|---|---|---|
| **3.** | **भाषा संचालनालय** | .. | .. |
| **4.** | **राज्य मराठी विकास संस्था** | .. | .. |
| **5.** | **महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ** | .. | .. |
| **6.** | **महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ** | .. | .. |

**कार्यक्रम क्रमांक-1**

**प्रस्तावना**

मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये “मराठी भाषा विभाग” असा स्वतंत्र प्रशासकीय विभाग शासन अधिसूचना ,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरओबी-2012/108/18(र. व. का.), दिनांक 29.11.2010 अन्वये निर्माण करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीतील सामान्य प्रशासन विभाग, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग आणि शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्या अखत्यारित असलेले मराठी भाषेशी संबंधित विषय, तसेच मराठी भाषाविषयक कामकाज हाताळणारी खालील कार्यालये/संस्था/मंडळे मराठी भाषा विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली वर्ग करण्यात आली आहेत.

1. भाषा संचालनालय,

2. राज्य मराठी विकास संस्था,
3. महाराष्ट्र राज्य साहित्यआणि संस्कृती मंडळ आणि
4. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ.

विभागाचा वित्तीय आराखडा पुढे दिला आहे

1) मंडळनिहाय खर्चाचा तपशील

(i) Details of Boardwise Expenditure

(रक्कम रु. लाखात)

| वर्ष | योजनेतर/ योजनांतर्गत | वैधानिक विकास मंडळ | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **विदर्भ** | **मराठवाडा** | **उर्वरित महाराष्ट्र** | **अविभाज्य** | **एकूण** |
| 2016-17 | योजनेतर | | | | | |
| | योजनांतर्गत | | | | | |
| | एकूण | | | | | |

(2) वित्तीय आवश्यकता

(ii) Financial requirements

(रक्कम रुपये हजारात)

| | अर्थसंकल्प 2017-18 Budget 2017-18 | | | सुधारित अंदाज 2017-18 Revised Estimates 2017-18 | | | अर्थसंकल्पीय अंदाज 2018-19 Budget Estimates 2018-19 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **Committed** | **Scheme** | **Total** | **Committed** | **Scheme** | **Total** | **Committed** | **Scheme** | **Total** |
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** | **8** | **9** | **10** |
| **(अ) कार्यालयनिहाय तरतुदी** | | | | | | | | | |
| (1) मराठी भाषा विभाग (खुद्द) | 332.84 | 502.00 | 834.84 | | | | | | |
| (2) भाषा संचालनालय | 709.31 | -- | 709.31 | | | | | | |
| (3) राज्य मराठी विकास संस्था | 102.50 | 400.30 | 502.80 | | | | | | |
| (4) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ | 100.51 | 378.90 | 479.41 | | | | | | |
| (5) महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ | 195.20 | 150.80 | 346.00 | | | | | | |
| **एकूण (अ)** | **1,440.36** | **1,432.00** | **2,872.36** | | | | | | |
| (1) ठेव संलग्न विमा योजना | 2.40 | -- | 2.40 | | | | | | |
| (2) शासकीय कर्मचा-यांना प्रदाने | 21.67 | -- | 21.67 | | | | | | |
| **एकूण (ब)** | **24.07** | **--** | **24.07** | | | | | | |
| **एकूण (अ+ब)** | **1,464.43** | **1,432.00** | **2,896.43** | | | | | | |

## कार्यक्रम क्रमांक-2

## मराठी भाषा विभाग, मंत्रालय

मराठी भाषा विभागातील पदे भरण्यासाठी  मुख्य सचिवांच्याअध्यक्षतेखाली शक्ती प्रदत्त समिती गठीत करण्यात आली असून या समितीने मराठी भाषा विभागासाठी मंत्रालय स्तरावर टप्प्या-टप्प्याने विविध संवर्गातील एकूण 53 पदांना मंजुरी दिली आहे.

### (1) अभिजात मराठी भाषा समिती :-

भारतीय भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यासंदर्भात केंद्र शासनाकडून कार्यवाही केली जाते. अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी केंद्र शासनाने कळविलेल्या निकषांच्या अनुषंगाने मराठी भाषा ही अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी पात्र ठरते किंवा कसे, याबाबतचा अभ्यास करून केंद्र शासनाकडे परिपूर्ण प्रस्ताव पाठविण्यासाठी राज्य शासनाने प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली भाषातज्ञांची एक समिती दिनांक 10.01.2012 च्या शासन निर्णयानुसार स्थापन केली. या समितीने तयार केलेला मराठी भाषेतीलअहवाल शासनाने दिनांक 12.07.2013 रोजी  केंद्र शासनाचे सचिव, संस्कृती मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडे पाठविला आहे. सदरच्या अहवालाची इंग्रजी अनुवादित प्रत दिनांक 16.11.2013 रोजी केंद्र शासनाचे सचिव, संस्कृती मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडे पाठविली आहे.

केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावासंदर्भात संस्कृती मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबतच्या विषयाची टिप्पणी दिनांक 28.04.2015 रोजी केंद्र शासनाच्या मंत्रीमंडळ सचिवालयाच्या विचारार्थ सादर करण्यात आली आहे. तथापि, भारतीय भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यासंदर्भात मा. उच्च न्यायालय, मद्रास येथे विविध जनहित याचिका प्रलंबित होत्या. त्यामुळे  सदरहू प्रस्ताव केंद्र शासनाच्या स्तरावर प्रलंबित होता. या प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मद्रास यांनी दिनांक 08.08.2016 रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरुन मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या विचाराधीन असल्याचे दिनांक 08.12.2016 च्या पत्रान्वये केंद्र शासनाच्या संस्कृती मंत्रालयाने कळविले आहे. सद्य:स्थितीत हा प्रस्ताव केंद्र शासनाकडे प्रलंबित आहे. याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे.

### (2) भाषा धोरण

महाराष्ट्र  राज्याचे पुढील **25** वर्षातील मराठी भाषेचे धोरण ठरविण्यासाठी डॉ**.** नागनाथ कोत्तापल्ले यांच्या अध्यक्षतेखालील तत्कालीन भाषा सल्लागार समितीने तयार केलेला मसुदा विचारात घेऊन डॉ**.** सदानंद मोरे यांच्या अध्यक्षतेखालील नवीन समितीने या मसुद्यामध्ये आवश्यक तेथे सुधारणा करून व अनेक बैठका घेऊन धोरणाचा कच्चा मसुदा तयार केला. भाषा सल्लागार समितीने तयार केलेला सुधारित मसुदा भाषा संचालनालयाच्या दिनांक 02.12.2016 रोजी शासनास सादर केला आहे सदर मसुद्यामध्ये मा. मंत्री महोदयांनी सुचविलेल्या सुधारणा करुन सुधारित मसुदा दि. 30 जून 2017 रोजी शासनास फेरसादर करण्यात आला आहे. त्यनुसार धोरणात्मक निर्णय घेण्याच्या अनुषंगाने शासनस्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे.

**(3) मराठी भाषा भवन :-**

सांस्कृतिक धोरण **2010** अंतर्गत राज्य शासनाने मराठी भाषेच्या विकास व संशोधनासाठी काम करणाऱ्या सर्व संस्थांना सर्व सुविधा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने मराठी भाषा भवन निर्माण करण्याचे ठरविले. त्यानुसार रंगभवन या खुल्या नाट्यगृहाच्या जागेवर “मराठी भाषा संशोधन, विकास व सांस्कृतिक केंद्र” बांधण्याचा शासनाने निर्णय घेतला. या संकुलामध्ये शिक्षण, प्रशिक्षण, जतन, संशोधन तसेच मराठी बोली अकादमी यांकरिता वेगवेगळी दालने व आवश्यक सोयी-सुविधा आणि आवश्यकतेनुसार मराठी भाषा प्रयोगशाळांची सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे. मात्र, “रंगभवन” या इमारतीचा समावेश हेरीटेज यादीमध्ये असल्याने सदर ठिकाणी बांधकाम करण्यास मुंबई वारसा जपणूक समितीने आक्षेप घेतल्यामुळे “भाषा भवन” उभारणे शक्य झाले नाही. सद्य:स्थितीत मराठी भाषा भवन इमारत बांधकामाकरीता पर्यायी व्यवस्था करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

**(4) मराठी भाषा संवर्धन पंधरवडा : शासन निर्णय, मराठी भाषा विभाग, दिनांक** 12.04.2013 **अन्वये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार राज्यामध्ये दिनांक** 1 **मे ते** 15 **मे हा कालावधी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा म्हणून साजरा करण्यात येत असे तथापि या कार्यक्रमामध्ये शाळा व महाविद्यालयांचा सहभाग वाढण्याच्या दृष्टीने शासन निर्णय, मराठी भाषा विभाग, दिनांक** 22.05.2015 **अन्वये सदर कार्यक्रम दिनांक** 01 **जानेवारी ते** 15 **जानेवारी या कालावधीत साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार सन** 2016 **पासून सदर कार्यक्रम संपुर्ण राज्यभर या सुधारित कालखंडात साजरा करण्यात येत असुन त्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना दरवर्षी शासन परिपत्रकाद्वारे देण्यात येतात**.

**(5) मराठी भाषा गौरवदिन :** ज्येष्ठ कवी वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले असून, मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. आपल्या मातृभाषेचा गौरव म्हणून आणि त्यांच्या स्मृतीला अभिवादन म्हणून शासन निर्णय क्र.मभादि-1012/ प्र.क्र.88/2012/भाषा-3, दिनांक 21 जानेवारी, 2013 अन्वये त्यांचा 27 फेब्रुवारी हा जन्मदिन राज्यभर "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर शासन निर्णयास अनुसरुन सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये, शासकीय संस्था/मंडळ, सार्वजनिक उपक्रम इत्यादि कार्यालयांनी समारंभपूर्वक "मराठी भाषा गौरव दिन" सोहळा साजरा करण्याबाबत **दरवर्षी स्वतंत्रपणे शासन परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात येतात**.

शासनातर्फे या दिवशी मराठी साहित्य क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या ज्येष्ठ साहित्यिकास विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार, उत्कृष्ट प्रकाशन संस्थेस श्री. पु. भागवत पुरस्कार, मराठी भाषा संवर्धनासाठी मोलाचे योगदान देणा-या व्यक्तीस अथवा संस्थेस आंतरराष्ट्रीय किर्तीचे ज्येष्ठ भाषा वैज्ञानिक आणि साहित्य समीक्षक डॉ.अशोक केळकर यांचे नांवे "मराठी भाषा अभ्यासक पुरस्कार" व कवितेच्या माध्यमातून भाषा संवर्धनाचे कार्य करणा-या कवीवर्य मंगेश पाडगांवकर यांचे नांवे “मराठी भाषा संवर्धक पुरस्कार” असे पुरस्कार

त्याचप्रमाणे उत्कृष्ट मराठी वाङमय निर्मितीस "स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङमय पुरस्कार" या पुरस्कारांचे वितरण करण्यात येते.

**(6) <u>वाचन प्रेरणा दिन</u> : माजी राष्ट्रपती स्व.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने** 15 **ऑक्टोबर हा त्यांचा जन्मदिवस "वाचन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे**. **या निर्णयास अनुसरुन शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची प्रेरणा निर्माण करण्यासाठी व वाचनाची आवड वृध्दिंगत करण्यासाठी** सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये, शासकीय संस्था/मंडळ, सार्वजनिक उपक्रम इत्यादि कार्यालयांनी **"वाचन प्रेरणा दिन" साजरा** करण्याबाबत **मार्गदर्शक सूचना देण्यासाठी दरवर्षी स्वतंत्र शासन परिपत्रक निर्गमित करण्यात येते**.

.........

**विभागाची संरचना**

मंत्री

↓

प्रधान सचिव/सचिव

↓

सह सचिव/उपसचिव

↓

↓ ↓ ↓

अवर सचिव
(आस्थापना)

↓

कक्ष अधिकारी (आस्था-1)
कक्ष अधिकारी (भाषा - 3)
कक्ष अधिकारी (रोख शाखा)

अवर सचिव
(अर्थसंकल्प)

↓

कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प)
कक्ष अधिकारी (आस्था-2)
कक्ष अधिकारी (भाषा-2)
ई गव्हर्नन्स

अवर सचिव
(गृह व्यवस्थापन)

↓

कक्ष अधिकारी (नोंदणी)
कक्ष अधिकारी (भाषा-1)

## कर्मचारी विषयक गोषवारा
## Personnel Summary

| अ.क्र. (1) | पदनाम (2) | वेतनश्रेणी (3) | पदसंख्या (4) | Designation (5) |
|---|---|---|---|---|
| | **(अ) राजपत्रित (A) Gazetted** | | | |
| 1 | प्रधान सचिव/सचिव | संवर्ग पद | 1 | Pr. Secretary/Secretary |
| 2 | सह सचिव | रु. 37400-67,000 ग्रेड पे 8700 | | Joint Secretary |
| 2 | उप सचिव | रू.15600-39100 ग्रेड पे 7600 | 1 | Deputy Secretary |
| 3 | अवर सचिव | रू.15600-39100 ग्रेड पे 6600 | 3 | Under Secretary |
| 4 | कक्ष अधिकारी | रू.9300-34800 ग्रेड पे 4800 | 8 | Section Officer |
| | | **एकूण (अ)** | **13** | **Total (A)** |
| | **(ब) अराजपत्रित (B)Non-Gazetted** | | | |
| 1 | लघुलेखक (उच्चश्रेणी) | रू.9300-34800 ग्रेड पे 4400 | 3 | Stenographer (H.G.) |
| 2 | सहायक | रू.9300-34800 ग्रेड पे 4300 | 9 | Assistant |
| 3 | रोखलेखापाल | रू.9300-34800 ग्रेड पे 4300 | 1 | Cash Accountant |
| 3 | लघुलेखक (निम्नश्रेणी) | रू.9300-34800 ग्रेड पे 4300 | 2 | Stenographer (L.G.) |
| 4 | लिपिक-टंकलेखक | रू.5200-20200 ग्रेड पे 1900 | 12 | Clerk-cum-Typist |
| 5 | वाहनचालक | रू.5200-20200 ग्रेड पे 1900 | 2 | Driver |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | **एकूण (ब)** | **29** | **Total (B)** |
| **(क) अराजपत्रित (वर्ग-4) (C) Non-Gazetted (Class-IV)** | | | | |
| 1 | शिपाई | रू.4440-7440 ग्रेड पे 1300 | 8 | Peon |
| | | **एकूण (क)** | **8** | **Total (C)** |
| | **एकूण (अ+ब+क)** | | **50** | **Grand Total (A+B+C)** |

## कार्यक्रम क्रमांक-3

## भाषा संचालनालय

शासन व्यवहारात मराठीचा वापर या शासनाच्या प्रतिज्ञाबद्ध धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी होण्यासाठी करावयाच्या उपाययोजनेचे काम मुख्यत: भाषा संचालनालयाचे असून त्यासाठी ह्या संचालनालयाकडुन विविध प्रकारची कामे पार पाडण्यात येतात :-

**भाषा अनुवाद व शब्दावली या दोन प्रमुख शाखांच्या माध्यमातून भाषा विकासाची महत्वाची कामे हातळण्यात येतात. त्याच बरोबर भाषा विषयक धोरणात्मक काम करण्यासाठी विभागांतर्गत "भाषा सल्लागार समिती" कार्यरत आहे. महाराष्ट्र शासनाने दि.** 22 **जून**, 2010 **च्या शासन निर्णयान्वये शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा वापर करण्याचे धोरण राबविण्यासाठी भाषा संचालनालयांतर्गत कायम स्वरुपी भाषा सल्लागार समितीची स्थापना केली आहे. या समितीवरील अशासकीय सदस्यांची नियुक्ती** 3 **वर्षांकरिता असल्याने समितीचे अध्यक्ष आणि सदस्य नव्याने नियुक्त करुन दि.** 05 **ऑगस्ट**, 2015 **च्या शासन निर्णयान्वये श्री. सदानंद मोरे यांच्या अध्यक्षतेखाली भाषा सल्लागार समितीची पुनर्रचना करण्यात आली. सदर समितीवरील अशासकीय व शासकीय सदस्यांची संख्या** 28 **असून या समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे आहे** :-

**(अ) राज्याचे पुढील** 25 **वर्षातील मराठी भाषेचे धोरण ठरविणे**,

**(आ)भाषा अभिवृद्धीसाठी नवनवे उपाय व कार्यक्रम सुचविणे व या अनुषंगाने शासनाला मार्गदर्शन करणे**,

**(इ) भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या कोशांमध्ये प्रचलित शब्दांची भर घालून कोश अद्ययावत करणे**,

**(ई) नवीन परिभाषा कोशांची निर्मिती करणे आणि**

**(उ) परिभाषा कोशांचे पुनर्मुद्रण, परिभाषेतील अत्यावश्यक परिष्करणे,शब्दव्युत्पत्ती मराठी परिभाषिक संज्ञांच्या समस्या सोडविणे.**

**भाषा संचालनालयाची महत्वाची कामे :-**

**(1) राज्य कायदे व नियमांचे मराठीकरण** :-

- शासन अधिसूचना साप्रवि क्र.ओएलएफ-1095/737/प्र.क्र.36/95/20 ब, दिनांक 14/08/1995 अन्वये महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, 1964 चे कलम 5 अंमलात आले असून त्यानुसार 15 ऑगस्ट,1995 पासून राज्य विधानमंडळात सादर केली जाणारी सर्व विधेयके, विधानमंडळाने संमत करावयाचे सर्व अधिनियम, मा. राज्यपालांनी प्रख्यापित केलेले सर्व अध्यादेश तसेच आदेश, नियम, विनियम, उपविधी

मूळ स्वरूपात मराठीत सादर करणे बंधनकारक केले आहे व मराठीतील अधिनियम व नियमांना कायद्यांचा मूळ मसुदा समजण्यात येत आहे. तथापि, राज्य अधिनियम व नियम मूलत: मराठीत तयार करण्यासाठी विधि व न्याय विभागामध्ये स्वतंत्र यंत्रणा नसल्याने कायद्याच्या इंग्रजी मसुद्यांचा मराठी अनुवाद करून ते विधानमंडळत सादर केले जातात.

- महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, 1965 च्या कलम 5 ची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने, भाषा संचालनालयाद्वारे सन 2017-18 या वर्षात पुढीलप्रमाणे राज्य अधिनियम व नियमांचे मराठीकरण केले आहे :-

(अ) राज्य विधानमंडळात सादर केली जाणारी सर्व विधेयके

(ब) राज्य विधानमंडळाने संमत केलेले अधिनियम

(क) अनुच्छेद 213 अन्वये महाराष्ट्राच्या मा. राज्यपालांनी प्रस्थापित केलेले सर्व अध्यादेश.

(ड) केंद्रीय व राज्य अधिनियमांखालील सर्व नियम, आदेश, विनियम व उपविधी.

**(2) राज्य कायद्यांचे अद्ययावतीकरण :**

**राज्य विधानमंडळाने केलेल्या** सुधारणा अधिनियमांतील तरतुदींचा समावेश करून मूळ राज्य अधिनियमांचे अद्ययावतीकरण करण्याचे व ते पुस्तक स्वरूपात प्रसिद्ध करण्याचे काम डिसेंबर, 1983 पासून भाषा संचालनालयाद्वारे केले जाते. यांमध्ये पुढील कामांचा समावेश होतो:-

(अ) राज्य विधानमंडळाने सुधारणा अधिनियमान्वये मूळ कायद्यांमध्ये केलेल्या सुधारणा समाविष्ट करणे.

(ब) अद्ययावत स्वरूपात राज्य अधिनियम पुनर्मुद्रित प्रतीच्या (रिप्रिंटच्या) स्वरूपात प्रसिध्द करणे.

(क) राज्य अधिनियमांचे एकत्रीकरण करून महाराष्ट्र अधिनियम संहिता या स्वरूपात प्रसिध्द करणे.

(ड) राज्य अधिनियमांचे अद्ययावतीकरण करून त्यांची पुस्तक स्वरूपात छपाई करणे व ते भाषा संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे.

आतापर्यंत 602 राज्य अधिनियमांचे अद्ययावतीकरण करुन ते पुस्तक स्वरुपात व संकेत स्थळावर प्रसिध्द केलेले आहेत. तथापि, नवीन राज्य अधिनियम ांच्या निर्मितीबरोबरच मूळ कायद्यामध्ये सुधारणा करण्याचे काम राज्य विधानमंडळात सतत चालू असल्याने अद्ययावतीकरण करुन पुस्तक स्वरुपात प्रसिध्द केलेल्या पूर्वीच्या राज्य अधिनियमांमध्ये सुधारणा करुन त्यांचे पुन्हा अद्ययावतीकरण करण्याची प्रक्रिया करण्यात येते. त्यानुसार, सन 2017-18 या वर्षात 42 राज्य अधिनियमांचे नव्याने अद्ययावतीकरण करण्यात आले आहे.88 राज्य अधिनियम तपासून मुद्रितांसाठी शासकीय मुद्रणालयाकडे पाठविलेले आहेत व त्यापैकी 15 राज्य अधिनियम अंतिम छपाईसाठी पाठविले आहेत.

**(3) भारताचे संविधान व केंद्रीय अधिनियमांचे मराठीकरण :**

प्राधिकृत पाठ (केंद्रीय कायदे) अधिनियम, 1973 अन्वये केंद्रीय अधिनियमांचा व भारताच्या संविधानाचा मराठी अनुवाद करून ते प्राधिकृत पाठाच्या स्वरूपात प्रसिध्द करण्याचे काम भाषा संचालनालयाद्वारे केले जाते.

केंद्रीय अधिनियमांचे मराठीकरण करून प्राधिकृत पाठाच्या स्वरूपात प्रसिद्ध करण्याची प्रक्रिया :-

(1) केंद्रीय अधिनियमांचा अनुवाद करणे, अनुवाद तपासणे, सुधारणा बसविणे व मुद्रित वाचन करणे.

(2)भारत सरकारच्या विधि व न्याय मंत्रालयाच्या राजभाषा खंडाच्या कार्यकारी गटाच्या बैठकीत केंद्रीय अधिनियमांच्या मराठी पाठास मान्यता घेणे.

(3) मा. राष्ट्रपतींच्या अनुमतीने केंद्रीय अधिनियम प्राधिकृत पाठाच्या स्वरूपात प्रसिध्द करणे.

(4) प्राधिकृत पाठाच्या स्वरुपात प्रसिध्द झालेले भारताचे संविधान व केंद्रीय अधिनियम प्रसिध्द करणे.

**(अ) भारताचे संविधान** : भारतीय संविधानाचा मराठी अनुवाद करुन मा. राष्ट्रपतींच्या मान्यतेने प्राधिकृत पाठाच्या स्वरुपात प्रसिध्द केले असून वेळोवेळी त्यात सुधारणा समाविष्ट करुन आतापर्यंत भारताच्या संविधानाच्या सात आवृत्त्या प्रसिध्द करण्यात आल्या असून त्यापैकी सहा आवृत्त्या मराठीत आहेत.

**(ब) भारताचे संविधान (द्विभाषी आवृत्ती प्रसिध्द)** : भारत सरकारने मंजूर केलेल्या रु.32,84,484/- इतक्या निधीतून भारतीय संविधानाच्या 10000 द्विभाषी प्रतींची छपाई करण्यात आली आहे.

**(क) केंद्रीय अधिनियम** :- प्राधिकृत पाठ (केंद्रीय कायदे) अधिनियम, 1973 अन्वये आतापर्यंत 349 केंद्रीय कायद्यांना भारत सरकारच्या राजभाषा खंडाच्या कार्यकारी गटाची मान्यता घेण्यात आली असून त्यापैकी मा. राष्ट्रपतींच्या मान्यतेने 175 केंद्रीय अधिनियम प्राधिकृत पाठाच्या स्वरूपात प्रसिध्द झाले आहेत. तसेच 44 केंद्रीय अधिनियम प्राधिकृत अनुवादाच्या स्वरुपात प्रसिध्द करुन त्यांचे अद्ययावत करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**(4) न्यायनिर्णयांचे मराठीकरण :-**

(**अ**) न्यायालयीन व्यवहारात मराठीचा वापर करण्याच्या दृष्टीने, भारतीय विधि प्रतिवृत्तातील (All India Law Report) मा. उच्च न्यायालयाच्या व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निवडक न्यायनिर्णयांचा मराठीत अनुवाद करणे व न्यायनिर्णय पत्रिकेच्या स्वरूपात प्रसिध्द करणे.

(ब) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद 141 अन्वये मा. उच्च न्यायालयांच्या व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयास कायद्याचा दर्जा असल्याने, हे काम न्याय व्यवहारात मराठीचा वापर करण्याच्या दृष्टीने महत्वाचे आहे.

(क) सध्या विधि अनुवाद व परिभाषा ही यापूर्वी कार्यरत असलेली समिती कार्यान्वित नसल्याने व पुरेशा मनुष्यबळा अभावी  न्यायनिर्णयांचे मराठीकरण करण्याचे काम सद्य:स्थितीत थांबलेले आहे.

**5) नियमपुस्तिका आणि प्रमाण नमुने व प्रपत्रे यांचे मराठीकरण : -**

(अ) शासन व्यवहारात मराठीचा वापर करण्याच्या दृष्टीने, मंत्रालयीन विभाग व शासकीय कार्यालयांद्वारे वापरल्या जाणाऱ्या नियमपुस्तिका (Manuals) आणि विशेष व प्रमाण नमुने आणि प्रपत्रे यांचा मराठीत अनुवाद करून  देण्याचे काम भाषा संचालनालयाद्वारे केले जाते.

(ब) भाषा संचालनालयाने सन 2017-18 या वर्षात 9015 फोलिओ इतके नियमपुस्तिका, प्रमाण नमुने व प्रपत्रे मराठीत उपलब्ध करून दिलेले आहेत.

**(6) प्रशासकीय व संकीर्ण प्रकरणांचे मराठीकरण : -**

(अ) महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, 1965 अन्वये शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा   100 टक्के वापर करण्याच्या धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने, सर्व मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय व संकीर्ण प्रकरणांसह पुढील प्रकरणांचा मराठीत अनुवाद करण्याचे व अनुवाद तपासणीचे काम भाषा संचालनालयाद्वारे केले जाते.

(ब)  केंद्र सरकारच्या व राज्य शासनाच्या विविध योजना व कार्यक्रम.

(क)  केंद्र सरकारची व राज्य शासनाची धोरणे व मार्गदर्शक तत्त्वे.

(ड)  मंत्रालयीन विभागांची अन्य प्रशासकीय व संकीर्ण प्रकरणे.

(इ)  विविध चौकशी समित्यांच्या व अभ्यास समित्यांचे अहवाल व कृती अहवाल.

(फ)  भारतीय निवडणूक आयोगाचे निदेश, आदेश, नियम, आचार संहिता व नियम पुस्तिका.

(ग)  मा. राज्यपालांचे निदेश व आदेश.

सन  2017-18 या वर्षात विविध मंत्रालयीन विभागाच्या प्रशासकीय व संकीर्ण प्रकरणांचा मराठी अनुवाद व अनुवाद तपासणी करुन दिलेला आहे. अलिकडील काळामध्ये मराठीकरण केलेली काही ठळक प्रशासकीय प्रकरणे पुढीलप्रमाणे आहेत :-

(1) भारत सरकारचे नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण.

(2) नागरी विमानचालन धोरण.

(3) पथ विक्रेता धोरण.

(4) पर्यटन धोरण

**(7) विविध अर्थसंकल्पीय प्रकाशनांचे मराठीकरण :-**

(**अ**) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 व 202 अन्वये वित्त विभागार्फत राज्य विधानमंडळाच्या तीनही अधिवेशनामध्ये सादर केल्या जाणाऱ्या पुढील अर्थसंकल्पीय प्रकाशनांचा मराठी अनुवाद, अनुवाद तपासणी, सुधारणा, मुद्रित वाचन, इत्यादी कामे भाषा संचालनायाद्वारे केली जातात :

(1) खर्चाचे पूरक विवरणपत्रे.

(2) अर्थसंकल्पविषयक निवेदन.

(3) अर्थसंकल्पीय अंदाज.

(4) अधिक खर्चाचे विवरणपत्र.

सन 2017-18 या वर्षात पुढील अर्थसंकल्पीय प्रकाशनांचा मराठी अनुवाद व अनुवाद तपासणी करण्याचे आणि त्याच्या अंतिम मुद्रणापर्यंतची कामे पार पाडलेली आहे.

(1) खर्चाचे पूरक विवरणपत्र, 2016-2017 ( मार्च, 2017, जुलै 2017 व डिसेंबर, 2017).

(2) अधिक खर्चाचे पूरक विवरणपत्र, (2012-13).

(3) अर्थसंकल्प विषयक निवेदन , 2017-2018.

**(8) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या लेखापरीक्षा अहवालांचे मराठीकरण :-**

(**अ**) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्यामार्फत भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 151 अन्वये मा. राज्यपालांना सादर केल्या जाणारे व दरवर्षी विधानमंडळात सादर केल्या जाणाऱ्या पुढील अहवालांचा मराठी अनुवाद, अनुवाद तपासणी व मुद्रित वाचन, इत्यादी कामे भाषा संचालनालयाद्वारे केली जातात :

(1) वित्तीय लेखा.

(2) विनियोजन लेखा.

(3) जमा महसुली लेखा.

(4) नागरी लेखा.

(5) लेख्यांवरील ओझरता दृष्टीक्षेप.

**(9) परिभाषा व शब्दकोश निर्मिती कार्य :-**

(**अ**) शासन व्यवहारात व न्याय व्यवहारात आणि शालेय व विद्यापीठ स्तरावरील अभ्यासक्रमात मराठीचा वापर करण्यासाठी प्रशासकीय, तांत्रिक व शास्त्रीय विषयांचे परिभाषा कोश व शब्दकोश तयार करण्याचे व त्यात सुधारणा करण्याचे काम भाषा संचालनालयाद्वारे केले जात आहे.

(**ब**) परिभाषा निर्मिती व कोश निर्मिती हे कार्य संशोधन व शैक्षणिक स्वरूपाचे आहे.

**(क)** विविध विषय तज्ज्ञांचा समावेश असलेल्या भाषा सल्लागार मंडळाच्या मार्गदर्शनाखाली हे कार्य पूर्वी करण्यात आले. आता भाषा सल्लागार समितीच्या व विविध परिभाषा उपसमित्यांच्या मार्गदर्शनाखाली नवीन परिभाषा कोश निर्मितीचे व पूर्वीच्या कोशांमध्ये सुधारणा करुन त्यांचे पुनर्मुद्रण करण्याचे  काम सुरू आहे.

### (10) भाषा संचालनालयाने तयार केलेले परिभाषा कोश, शब्दकोश व शासन व्यवहार उपयोगी मार्गदर्शक पुस्तिका :-

**(1) शब्दकोश :-** भाषा संचालनालयाने शासन व्यवहारास व न्याय व्यवहारास उपयुक्त असलेले पुढील कोश प्रसिध्द केलेले आहेत :

| | | | |
|---|---|---|---|
| 1) शासन व्यवहार कोश | 2) प्रशासन वाक्प्रयोग | 3) पदनाम कोश | 4) वित्तीय शब्दावली |
| 5) शासन व्यवहार शब्दावली | 6) न्यायव्यवहार कोश | | |

**(2) शासन व्यवहार उपयोगी मार्गदर्शक पुस्तिका :-** भाषा संचालनालयाने शासन व्यवहारास उपयोगी असलेल्या पुढील मार्गदर्शक पुस्तिका व ग्रंथ प्रसिध्द केलेले आहेत :

| | | | |
|---|---|---|---|
| 1) प्रशासनिक लेखन | 2) राजभाषा परिचय | 3) कार्यदर्शिका | 4) मराठी लघुलेखन मार्गदर्शिका |
| 5) शासन व्यवहारात मराठी | 6) मराठी टंकलेखन प्रवेशिका | 7) प्रमाणलेखन नियमावली | 8) मंथन |
| 9) मराठी लघुलेखन | 10) राजभाषा परिचय व कार्यरुप व्याकरण | | |

**(3) परिभाषा कोश :-** भाषा संचालनालयाने विविध विषयांचे पुढील शास्त्रीय व तांत्रिक परिभाषा कोश प्रसिध्द केलेले आहेत :

| | | | |
|---|---|---|---|
| 1) लोकप्रशासन परिभाषा कोश | 2) कृषिशास्त्र परिभाषा कोश | 3) तत्त्वज्ञान व तर्कशास्त्र परिभाषा कोश | 4) गणितशास्त्र परिभाषा कोश |
| 5) शिक्षणशास्त्र परिभाषा कोश | 6) मानसशास्त्र परिभाषा कोश | 7) रसायनशास्त्र परिभाषा कोश | 8) यंत्र अभियांत्रिकी परिभाषा कोश |
| 9) भूगोलशास्त्र परिभाषा कोश | 10) न्यायवैद्यक व विषशास्त्र परिभाषा कोश | 11) औषधशास्त्र परिभाषा कोश | 12) व्यवसाय व्यवस्थापन परिभाषा कोश |
| 13) साहित्य समीक्षा परिभाषा कोश | 14) वृत्तपत्रविद्या परिभाषा कोश | 15) वाणिज्यशास्त्र परिभाषा कोश | 16) धातुशास्त्र परिभाषा कोश |
| 17) शारीरशास्त्र परिभाषा कोश | 18) ग्रंथालयशास्त्र परिभाषा कोश | 19) विद्युत अभियांत्रिकी परिभाषा कोश | 20) संख्याशास्त्र परिभाषा कोश |
| 21) शरीरक्रियाशास्त्र परिभाषा कोश | 22) भूशास्त्र परिभाषा कोश | 23) स्थापत्य अभियांत्रिकी परिभाषा कोश | 24) अर्थशास्त्र परिभाषा कोश |
| 25) जीवशास्त्र परिभाषा कोश | 26) भौतिकशास्त्र परिभाषा कोश | 27) राज्यशास्त्र परिभाषा कोश | 28) भाषाविज्ञान व वाङ्.मयविद्या परिभाषा कोश |
| 29) समाजशास्त्र परिभाषा कोश | | | |

**(4) पारिभाषिक शब्दावल्या :-** भाषा संचालनालयाने, शास्त्रीय व तांत्रिक विषयाच्या पुढील शब्दावल्या मराठी X इंग्रजी या स्वरुपात प्रसिध्द केलेल्या आहेत :

| | | |
|---|---|---|
| 1) विकृतीशास्त्र पारिभाषिक शब्दावली | 2) भौतिकशास्त्र पारिभाषिक शब्दावली | 3) कृषिशास्त्र पारिभाषिक शब्दावली |

**(11)परिभाषा कोशांमध्ये व शब्द कोशांमध्ये सुधारणा करुन त्यांचे पुनर्मुद्रण करण्याचा प्रकल्प :-**

भाषा संचालनालयाने आतापर्यंत विविध विषयांचे परिभाषा कोश व शब्दकोश प्रसिद्ध केलेले असून भाषा सल्लागार समितीच्या मार्गदर्शनाखाली विविध विषयांच्या परिभाषा उपसमित्यांद्वारे पूर्वीच्या परिभाषा कोशांमध्ये सुधारणा करुन त्यांचे पुनर्मुद्रण करण्याचा प्रकल्प हाती घेतलेला असून या उपसमित्यांच्या अंतर्गत परिभाषा कोशासंबंधात पुढीलप्रमाणे कामकाज सुरू आहे :-

**(अ) विविध उपसमित्यांमार्फत सुरु असलेल्या परिभाषा कोशांच्या कामकाजाची सद्यस्थिती :-**

(1) शासन व्यवहार कोश, (2) कृषिशास्त्र परिभाषा कोश, (3) अर्थशास्त्र परिभाषा कोश, (4) तत्त्वज्ञान आणि तर्कशास्त्र परिभाषा कोश व (5) शिक्षणशास्त्र परिभाषा कोश या कोशांचे सुधारणा करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**(ब) भाषा संचालनालयाची प्रकाशने व परिभाषा कोश भ्रमणध्वनी ॲपवर टाकण्याचा प्रकल्प :- भाषा** संचालनालयाने प्रसिध्द केलेल्या शब्दकोशांचे व प्रकाशनांचे भ्रमणध्वनी ॲप तयार करण्याचा प्रकल्प हाती घेतला असून पहिल्या टप्प्यात १) कार्यदर्शिका २) प्रशासन वाक्प्रयोग ३) शासन व्यवहार कोश व ४) न्यायव्यवहार कोश यांचा ॲपमध्ये समावेश केला आहे.

**(क) भाषा संचालनालयाची प्रकाशने संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याबाबतची सद्यस्थिती :- भाषा** संचालनालयाचे परिभाषा कोश व अन्य प्रकाशने ई-पुस्तकाच्या स्वरूपात उपलब्ध करून देण्याचे काम सी-डॅक, पुणे या संस्थेमार्फत २०१४-१५ मध्ये पूर्ण करून घेण्यात आलेले होते. हे कोश शोधानुकूल पद्धतीचे असून ते coe.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. आता ते भाषा संचालनालयाच्या संकेतस्थळावर लवकरच उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**(12) शासन व्यवहारात मराठीचा वापर (शासकीय कार्यालयांची तपासणी) :-**

(**अ**) राजभाषा अधिनियम, 1964 अन्वये शासन व्यवहारात मराठीचा वापर करणे अनिवार्य केलेले असल्याने, शासन व्यवहारात मराठीचा वापर केला जातो किंवा कसे यादृष्टीने महाराष्ट्रातील मंत्रालयीन विभाग आणि शासकीय व निम-शासकीय कार्यालये यांची तपासणी करणे, त्यासंबंधातील अडचणी सोडविणे व मार्गदर्शन करणे आणि करावयाच्या उपाययोजनासंबंधी शासनाकडे अहवाल पाठविणे, इत्यादी कामे भाषा संचालनामयामार्फत केली जातात.

(ब) मुख्यालय स्तरावर भाषा संचालक व विभागीय स्तरावर विभागीय सहायक भाषा संचालक यांच्या नेतृत्वाखालील तपासणी पथकाद्वारे शासकीय कार्यालयांची तपासणी केली जाते.

**(13) भाषाविषयक परीक्षा :** एतदर्थ मंडळामार्फत घेतल्या जाणाऱ्या पुढील परीक्षा घेण्याची संपूर्ण जबाबदारी भाषा संचालनालय पार पाडत आहे. या परीक्षा वर्षातून दोन वेळा घेतल्या जातात. सदर परीक्षा पुढीलप्रमाणे आहेत:

1. मराठी भाषा (राजपत्रित) परीक्षा.
2. मराठी भाषा (अराजपत्रित) परीक्षा.
3. हिंदी भाषा (उच्च श्रेणी) परीक्षा.
4. हिंदी भाषा (निम्न श्रेणी) परीक्षा.
5. मराठी टंकलेखन परीक्षा.
6. मराठी लघुलेखन परीक्षा.

सन 2017-2018 मध्ये एतदर्थ मंडळाच्या मराठी भाषा, हिंदी भाषा, टंकलेखन व लघुलेखन परीक्षांसाठी एकूण 6342 उमेदवार बसले होते.

----------

भाषा संचालनालयाची रचना

भाषा संचालक भाषा सल्लागार समिती

## कर्मचारी विषयक गोषवारा
## Personnel Summary

| अ. क्र. | पदनाम | वेतनश्रेणी SCALE OF PAY | पदांची संख्या | DESIGNATION |
|---|---|---|---|---|
| **(अ) राजपत्रित (A) Gazetted** | | | | |
| 1. | भाषा संचालक | 15600-39100 ग्रेड पे 7600 | 1 | Director of Languages |
| 2. | भाषा उपसंचालक (अनुवाद व शब्दावली) | 15600-39100 ग्रेड पे 5400 | 1 | Dy.Director of Languages (Translation & Terminology) |
| 3. | भाषा उपसंचालक (विधि) | 15600-39100 ग्रेड पे 5400 | 1 | Dy.Director of Languages (Law) |
| 4. | विभागीय सहायक भाषा संचालक | 9300-34800 ग्रेड पे 4600 | 3 | Divisional Assistant Director of Languages |
| 5. | सहायक भाषा संचालक (अनुवाद व शब्दावली) | 9300-34800 ग्रेड पे 4400 | 5 | Assistant Director of Languages (Translation & Terminology) |
| 6. | सहायक भाषा संचालक (प्रशिक्षण व आस्थापना) | 9300-34800 ग्रेड पे 4400 | 1 | Assistant Director of Languages (Training & Establishment) |
| 7. | भाषा अधिकारी (हिंदी) | 9300-34800 ग्रेड पे 4400 | 1 | Language Officer (Hindi) |
| | | **एकूण (अ)** | **13** | **Total (A)** |
| **(ब) अराजपत्रित (B) Non-Gazetted** | | | | |
| 8. | मराठी लघुलेखक (उच्चश्रेणी) | 9300-34800 ग्रेड पे 4400 | 1 | Marathi Stenographer (H.G.) |
| 9. | पर्यवेक्षक (मराठी/हिंदी) | 9300-34800 ग्रेड पे 4300 | 10 (9+1) | Superviser |
| 10. | अधीक्षक | 9300-34800 ग्रेड पे 4300 | 7 | Superintedndent |
| 11. | अनुवादक (मराठी/हिंदी) | 9300-34800 ग्रेड पे 4200 | 46 (42+4) | Translator |
| 12. | वरिष्ठ लिपिक | 5200-20200 ग्रेड पे 2400 | 10 | Senior Clerk |
| 13. | मराठी लघुटंकलेखक | 5200-20200 ग्रेड पे 2400 | 2 | Steno-Typist (Marathi) |
| 14. | लिपिक-टंकलेखक (मराठी) | 5200-20200 ग्रेड पे 1900 | 19 | Clerk-Typist (Marathi) |
| 15. | लिपिक-टंकलेखक (इंग्रजी) | 5200-20200 ग्रेड पे 1900 | 1 | Clerk-Typist (English) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 16. | कनिष्ठ ग्रंथपाल | 5200-20200 ग्रेड पे 2000 | 1 | Junior Librarian |
| 17. | वाहनचालक | 5200-20200 ग्रेड पे 1900 | 2 | Driver |
| | | **एकूण (ब)** | **9**9 | **TOTAL (B)** |
| **(क) वर्ग ड (C) Class D** | | | | |
| 18. | नाईक | 4440-7440 ग्रेड पे 1600 | 2 | Naik |
| 19. | चपराशी | 4440-7440 ग्रेड पे 1300 | 18 | Peon |
| | | **एकूण (क)** | **20** | **TOTAL (C)** |
| **एकूण (अ + ब + क)** | | | **13**2 | **GRANT TOTAL(A+B+C)** |

## कार्यक्रम क्रमांक 4

## राज्य मराठी विकास संस्था

मराठी भाषा आणि महाराष्ट्राची संस्कृती यांचे संरक्षण, संगोपन आणि संवर्धन करण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाने दिनांक 1 मे 1992 रोजी ‘राज्य मराठी विकास संस्थेची’ स्थापना केली. ‘संस्था नोंदणी अधिनियम, 1860’ आणि ‘सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950’ अन्वये दिनांक 02.01.1993 रोजी संस्थेची धर्मादाय आयुक्त, मुंबई यांच्याकडे स्वायत्त संस्था म्हणून नोंदणी झाली. सर्व कायदेशीर बाबी पूर्ण झाल्यानंतर दिनांक 01.3.1993 पासून संस्थेच्या कामकाजास सुरुवात झाली. तेव्हापासून संस्था मराठी भाषेच्या विकासासाठी विविध उपक्रम राबवत आहे.

### संस्थेची उद्दिष्टे :

विविध क्षेत्रांत होणारा मराठीचा वापर अधिकाधिक गुणवत्तापूर्ण होत जावा, यासाठी प्रयत्नशील राहणे व मराठी भाषेच्या अभिवृद्धीची प्रक्रिया नियोजनपूर्वक गतिमान करणे ही या संस्थेच्या स्थापनेमागील दोन मुख्य उद्दिष्टे आहेत. त्यानुसार सर्व स्तरांवर मराठीचा विकास साधण्यासाठी संस्था स्वतंत्रपणे उपक्रम हाती घेते. भाषा व संस्कृतीच्या क्षेत्रात मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठी काम करणाऱ्या विविध शासकीय व अशासकीय संस्थांमध्ये समन्वय राखून त्या संस्थांच्या सहाय्यानेही काही उपक्रम संस्था पार पाडते.

### प्रशासकीय व्यवस्था :

संस्थेचे कामकाज तिच्या नियामक मंडळाच्या मान्यतेने चालते. संस्थेचे कार्यक्रम/उपक्रम/प्रकल्प यांचे अग्रक्रम ठरविण्यासाठी नियामक मंडळाच्या सल्ल्यानुसार एक उपक्रम समिती, आर्थिक बाबी विचारात घेण्यासाठी नियामक मंडळाच्या सदस्यांमधून निर्माण केलेली एक वित्त समिती आहे आणि संस्थेचे आर्थिक, प्रशासकीय व कायदेशीर नियोजन व व्यवस्थापन करण्यासाठी तसेच संस्थेच्या विविध

प्रकल्पांच्या अंमलबजावणीच्या कामावर देखरेख ठेवण्यासाठी एक कार्यकारी समिती नेमण्यात आली आहे. संस्थेच्या विविध कार्यासाठी या कार्यकारी समितीची मंजुरी आवश्यक असते.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री हे संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत आणि मराठी भाषा विभागाचे मंत्री हे संस्थेचे पदसिद्ध उपाध्यक्ष आहेत.

**संस्थेचे आजवरचे कार्य :**

संस्थेने आपल्या उद्दिष्टांना अनुसरून विविध प्रकारचे उपक्रम आयोजित केले आहेत.

**अ) चर्चासत्रे :** आजपर्यंत विविध विषयांवर 25 हून अधिक राज्यस्तरीय चर्चासत्रांचे आयोजन राज्य मराठी विकास संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

**(ब) काही महत्त्वपूर्ण प्रकाशने_:** मराठी भाषेच्या विकासाला पूरक असे माहितीकोश, संकल्पनाकोश, सूची, माहितीपुस्तिका, कार्यपुस्तिका, वैचारिक, संशोधनात्मक लेखन, मराठी साहित्यकृतींची हिंदी भाषांतरे अशी विविधांगी 71 पुस्तके संस्थेने प्रकाशित केली आहेत. त्यापैकी काही उल्लेखनीय प्रकाशने पुढीलप्रमाणे आहेत :-

**(1) भाषाविषयक :** (अ) **शिक्षण शिक्षक व अभ्यासक्रम** - (संपादन - रमेश पानसे) जन्मभाषेचा पाश तोडून आम्ही काय करणार? ना देश, ना गोत, ना राष्ट्र असे आम्हांस व्हावयाचे आहे काय?, या मौलिक आणि मूलभूत प्रश्नाला भिडणारे, मराठीच्या शिक्षणक्रमाशी संबंधित असलेले एक जुने (1906) चिरतरुण पुस्तक.

(ब) **मराठी भाषा : वाढ आणि बिघाड** - (श्री. के. क्षीरसागर) मराठी बोलताना आणि तिच्यातून लेखनव्यवहार पार पाडताना सर्वसामान्य शिक्षित माणसाच्या मनात आज जे-जे प्रश्न घुटमळत आहेत, त्यांचा मुक्त मनाने घेतलेला परामर्श.

(क) **महाराष्ट्राचा भाषिक नकाशा पूर्वतयारी** - (प्रमुख संशोधक - डॉ. रमेश धोंगडे, संशोधन समन्वयक आणि संशोधक साहाय्यक - डॉ. अशोक सोलनकर) प्रमाण मराठी, बोली, उपभाषा, आदिवासींच्या भाषा, मिश्रभाषा इत्यादिंचे विविध भाषिक आविष्कार, त्यांची प्रदेशानुसार नकाशाद्वारे मांडणी करून महाराष्ट्रातील भाषांची वैविध्यपूर्ण माहिती देणारा ग्रंथ.

**(2) कोश व सूची वाङ्मय :** (अ) कोश व सूची वाङ्मय : स्वरुप आणि साध्य - (संपादन - सरोजिनी वैद्य, सुषमा पौडवाल, अनिता जोशी, कविता महाजन) बी.ए., एम. ए. चे मराठी विषयाचे विद्यार्थी, ग्रंथालयशास्त्र विद्यार्थी तसेच संशोधनपर लेखन करू इच्छिणाऱ्यांसाठी उपयुक्त. संस्कृत-इंग्रजी-मराठी भाषांतील वैविध्यपूर्ण कोश व सूचीवाङ्मयाचा सांगोपांग परिचय करून देणारा ग्रंथ.

**(ब) शालेय मराठी शब्दकोश** - (वसंत आबाजी डहाके, गिरीश पतके) इयत्ता 5 वी ते 12 वी पर्यंतच्या सर्व विषयांच्या मराठी पाठ्यपुस्तकांशी संबंधित शब्द, संज्ञा, वाक्प्रचार आदिंची सचित्र व सोदाहरण ओळख. मराठी अभ्यास परिषदेतर्फे दिले जाणारे मराठी भाषाविषयक लेखनाचे महाबँक पारितोषिक 1999.

**(क) विज्ञान संकल्पना कोश** - (प्रा. रा. वि. सोवनी) इयत्ता 5 वी ते 10 पर्यंतच्या रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र व जीवशास्त्रातील संकल्पना सुबोध मराठीतून उलगडून सांगणारा कोश. (मराठी विज्ञान परिषदेच्या सहकार्याने)

**(ड) मराठी लघुलेखन शब्दकोश** (व. वा. इनामदार) मराठी लघुलेखनाचे शिक्षक आणि विद्यार्थी यांना सरावासाठी उपयुक्त ठरलेला लघुलेखनविषयक एकमेव ग्रंथ. ना. गो. कालेलकर पुरस्कार, महाराष्ट्र राज्य शासन पुरस्कार 1995-96.

**(इ) दलित ग्रामीण साहित्य शब्दकोश** - (संपादक - डॉ. गंगाधर पानतावणे) याकरिता इ.स. 1818 ते 2005 या कालखंडात प्रकाशित झालेल्या साहित्यातून दलित-ग्रामीण जीवनानुभव व्यक्त झाले आहेत असे साहित्य या शब्दकोशासाठी आधारभूत मानले आहे. त्यातील अपरिचित व नवीन शब्द कोशबद्ध करण्यात येणार आहेत. दोन खंड प्रकाशित, तिसरा खंड लवकरच प्रकाशित होईल.

**(3) शैक्षणिक :** (अ) मराठी लेखन मार्गदर्शिका - (यास्मिन शेख) सर्वसामान्य नागरिक, शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी, भाषा शिकणाऱ्या अन्य भाषक व्यक्ती, दूरचित्रवाणीपटावर लेखन करणारे कलावंत, पाट्या रंगविणारे रंगारी, टंकलेखक, संगणकावर अक्षरजुळणी करणारे जुळारी अशा सर्वांना मराठीत लेखन करण्यासाठी बिनचूक मार्गदर्शन करणारे उपयुक्त पुस्तक.

**(ब) प्रशासनिक मराठी भाषेचा विकास** - (गीता भागवत) प्रशासनिक लेखन करणा-यांसाठी मार्गदर्शनपर सूचनांसह, प्रशासनिक मराठीच्या वस्तुनिष्ठ व शास्त्रशुद्ध पद्धतीने केलेला अभ्यास.

**(क) इतर उपक्रम :**

**(1) इतर राज्यांतील मराठी भाषिक विद्यार्थ्यांना मदत व भारतातील विविध राज्यांतील व जगातील अनेक देशांतील मराठी भाषकांसाठी उपक्रम** : मध्यप्रदेश, कर्नाटक, आंध्रप्रदेश, गुजरात इत्यादि राज्यांतील शाळांना महत्त्वाची पुस्तके पाठवण्याचे काम संस्था करीत आहे. सन 1994 पासून संस्थेने आंध्रप्रदेशातील महाराष्ट्र मंडळ, हैद्राबाद यांना व त्यांनी सुचविलेल्या शाळांतील इयत्ता 1 ली ते 12 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना बालभारती, कुमारभारती, युवकभारती अशी मराठीची पाठ्यपुस्तके पाठविण्यात येतात. महाराष्ट्र मंडळ ही पुस्तके विद्यार्थी प्रतिष्ठान महाराष्ट्र मंडळ (आंध्र प्रदेश) यांच्यामार्फत संबंधित शाळांना वितरित करीत असते. इतर राज्यांतील व देशांतील मराठी वाचकांना दर्जेदार मराठी पुस्तके वाचण्यासाठी उपलब्ध व्हावीत, या उद्देशाने संस्थेने सन 2003 पासून ग्रंथालयांना व मराठी मंडळांना ग्रंथभेट हा उपक्रम हाती घेतला आहे. आजपर्यंत हैद्राबाद, बेळगाव, भोपाळ, सुरत, जयपूर, अहमदाबाद, बडोदा, रायपूर, इंदूर, राजकोट, जबलपूर इत्यादि ठिकाणच्या 23 ग्रंथालयांना प्रत्येकी पाच हजार रुपयांची पुस्तके भेट म्हणून पाठविण्यात आली आहेत. तसेच अमेरिकेतील मराठी मंडळांनाही संस्थेने तीन वर्ष ललित साहित्याची पुस्तके पाठविली आहेत. सन 2013-14 मध्ये संस्थेने सिकंदराबाद, इंदूर, रायपूर, बेळगाव, जयपूर, भोपाळ, तंजावर, कोलकत्ता, वाराणसी, पुणे इत्यादि ठिकाणच्या 13 मराठी मंडळांना

पुस्तके पाठवली आहेत. या योजनेतंर्गत बृहन्महाराष्ट्रातील निवडक मराठी मंडळांना मराठीतील चांगली, निवडक पुस्तके पाठविण्याची कार्यवाही संस्थेतर्फे सुरू आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या सूचनेनुसार ज्येष्ठ साहित्यिक श्री. चंद्रकांत खोत यांची निवडक पुस्तकेदेखील बृहन्महाराष्ट्रातील निवडक मराठी मंडळांना पाठविली आहेत.

**(2) बृहन्महाराष्ट्र मंडळांना अर्थसहाय्य योजना** : महाराष्ट्र शासनाने सन 2010 मध्ये स्वीकारलेल्या सांस्कृतिक धोरणातील प्रकरण 4 "भाषा आणि साहित्य" याअंतर्गत बृहन्महाराष्ट्र या विभागात उल्लेखिल्यानुसार महाराष्ट्राबाहेर अन्य राज्यांत मराठी भाषा, साहित्य आणि महाराष्ट्रीय संस्कृती या संदर्भात आणि महाराष्ट्राबाहेर मराठी ग्रंथ प्रकाशनाचे दर्जेदार कार्य करणाऱ्या मान्यताप्राप्त संस्थांना अर्थसाहाय्य देण्याची योजना कार्यान्वित आहे. राज्य मराठी विकास संस्थेच्या घटनेतील "अन्य राज्यात व परदेशात असलेल्या मराठी भाषकांसाठी विविध भाषिक उपक्रम करणे" ह्या उद्दिष्टाचा भाग म्हणून महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळामार्फत राबविण्यात येणारी ही योजना शासन निर्णय, मराठी भाषा विभाग दिनांक 13.06.2016 अन्वये राज्य मराठी विकास संस्थेकडे हस्तांतरित केली आहे. या योजनेअंतर्गत, महाराष्ट्राबाहेर मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी कार्य करणाऱ्या देशांतर्गत बृहन्महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त संस्था/मंडळे यांना विहित कार्यपद्धतीनुसार एकूण रु. 20.00 लक्ष (प्रत्येकी रु. 2.00 लक्षच्या मर्यादेत) अर्थसहाय्य करण्यात येते. सन 2016-17 व सन 2017-18 या वित्तीय वर्षात 19 संस्थांना अर्थसहाय्य करण्यात आले आहे.

**(3) पुस्तक प्रदर्शन :** विविध शासकीय विभाग तसेच शासन पुरस्कृत संस्था यांनी प्रकाशित केलेली दर्जेदार मराठी पुस्तके लोकांपर्यंत पोहोचावीत यासाठी संस्था प्रयत्नशील आहे. आंतरराष्ट्रीय पुस्तकवर्षाचे निमित्त साधून सन 2002 मध्ये पहिल्यांदा विविध शासकीय विभाग तसेच शासन पुरस्कृत संस्था यांनी प्रकाशित केलेल्या पुस्तकांचे प्रदर्शन मुंबई येथे आयोजित करण्यात आले. त्यानंतर दरवर्षी शासकीय प्रकाशनांचे प्रदर्शन महाराष्ट्रातील विविध ठिकाणी स्वतंत्रपणे आयोजित करण्यात येत आहे. तसेच इतरत्र आमंत्रित केलेल्या प्रदर्शनांमध्ये संस्थेचा सहभाग असतो.

**(4) वाचन प्रेरणा दिन** : भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून सन 2015 पासून दरवर्षी दिनांक 15 ऑक्टोबर हा दिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्त विविधांगी कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. सन 2017 मध्ये येथे घडले साहित्यिक या वारसा फेरीचे आयोजन करण्यात आले. बोरीवली येथे सुरु झालेल्या हमाल व डबेवाल्यांच्या ग्रंथालयासाठी पुस्तके मिळवून दिली. "स्पंदन" या संस्थेच्या सहकार्याने कवीवर्य विंदा करंदीकर यांच्या जन्मशताब्दी निमित्त कोकण आणि कोल्हापूर या भागात 20 कार्यक्रम आयोजित केले व मंत्रालयात आयोजित वाचनकटटयासाठी विविध पुस्तके आणि दिवाळी अंकाचे वाटप केले.

**(5) मराठी भाषा गौरवदिन :** शासनाच्या धोरणानुसार कवी कुसुमाग्रजांच्या जन्मदिनानिमित्त दरवर्षी 27 फेब्रुवारी हा दिवस मराठी भाषा गौरवदिन म्हणून साजरा केला जातो. सन 2016 मध्ये या निमित्ताने वाचन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. शासन निर्णय, मराठी भाषा विभाग, दिनांक 18.02.2016 अन्वये सन 2016 पासून "डॉ. अशोक रा. केळकर मराठी भाषा अभ्यासक पुरस्कार" आणि "कविवर्य मंगेश पाडगावकर मराठी भाषा संवर्धक पुरस्कार" हे दोन नवीन पुरस्कार मराठी भाषा संर्वधनासाठी मोलाचे योगदान देणाऱ्या व्यक्तीस अथवा संस्थेकरिता सुरु करण्यात आले आहेत.मराठी भाषा गौरवदिन समारंभाच्या वेळी सदर पुरस्कारांचे वितरण करण्यात येते.

सन 2017 या वर्षीचा डॉ.अशोक केळकर भाषा अभ्यासक पुरस्कार -------------यांना प्रदान करण्यात आला असून, कविवर्य मंगेश पाडगांवकर भाषासंवर्धक पुरस्कार, श्री.------------ यांना जाहिर करण्यात आला आहे.

**(6) मराठी भाषा संवर्धन पंधरवडा : सन** 2018 **मध्ये** या कार्यक्रमाच्या निमित्ताने मराठी विकिपिडिया विषयी जागृती करण्यासाठी राज्य **मराठी विकास संस्थेच्या वतीने पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थी आणि प्राध्यापक ह्यांच्यासाठी एकुण 12 कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. दि**. 10 **जाने**. 2018 **ते दि**. 12 **जाने** 2018 **या कालावधीत मंत्रालयात आयोजित ग्रंथप्रदर्शनात संस्थेने ग्रंथविक्रीसाठी सहभाग घेतला**.

**(ड) संस्थेत सुरु असलेले उल्लेखनीय प्रकल्प :**

**(1) दलित-ग्रामीण साहित्य शब्दकोश व साहित्यसूची :** दलित आणि ग्रामीण साहित्य हे मराठी साहित्यातील महत्त्वाचे असे दोन प्रवाह आहेत. अपरिचित शब्द, संज्ञा, संकल्पना, म्हणी, वाक्यप्रयोग यांमुळे हे साहित्य काही प्रमाणात वाचकांच्या दृष्टीने दुर्बोध राहिले आहे. लोकजीवनाच्या वेगवेगळया अंगांशी निगडित अशा दलित-ग्रामीण साहित्यातील, शब्दांचा नेमका अर्थ सापडेल असा शब्दकोश आज मराठीत नसल्याने तसेच ह्या साहित्यामधून जे नवनवीन आणि अपरिचित शब्द मिळतात ते प्रमाण मराठी भाषेत येणे आवश्यक असल्याने असे शब्द विविध साहित्यकृतींमधून निवडून त्यांचे अर्थ तपशीलांसह या कोशात दिलेले आहेत. तो विशिष्ट शब्द असलेले साहित्यकृतीतील मूळ वाक्यही वाचकांच्या संदर्भासाठी त्या त्या नोंदीमध्ये दिलेले आहे. या कोशाचे खंड- 1 व 2 प्रकाशित झाले असून तिसऱ्या खंडाची अंतिम मुद्रणप्रत तयार करण्याचे काम पूर्ण झाले आहे. तसेच पुरवणी खंड आणि सूची खंड तयार करण्याची कार्यवाही चालू आहे.

**(2) दलित-ग्रामीण-साहित्य रुढी, प्रथा, परंपरा विधिकोश :** दलित-ग्रामीण साहित्य शब्दकोश या प्रकल्पाचाच हा एक भाग असून त्यामध्ये दलित व ग्रामीण साहित्यकृतींमधून आलेल्या विविध जाती-जमातींच्या विधि, रूढी, प्रथा, परंपरा, श्रद्धा, समजुती, सण-उत्सव, नवस-सायास, दैवत, लोकाचार

इत्यादि विषयांच्या अनुषंगाने सांस्कृतिक संदर्भ असलेल्या अनेक संकल्पनांचे संकलन करून त्यांची सचित्र स्पष्टीकरणात्मक माहिती या कोशातून दिलेली असून हा कोश प्रकाशित करण्यात आला आहे.

**(3) वस्त्रनिर्मिती-माहितीकोश :** वस्त्रोद्योगाची सर्वांगीण व अद्ययावत माहिती मराठी भाषेतून उपलब्ध करून देणारा 'वस्त्रनिर्मिती माहितीकोश' हा प्रकल्प राज्य मराठी विकास संस्था आणि दत्ताजीराव कदम तांत्रिक शिक्षण संस्था, इचलकरंजी यांनी संयुक्तपणे कार्यान्वित केला आहे. झपाट्याने विकसित होणाऱ्या विज्ञान-तंत्रज्ञानामुळे भारतातील वस्त्रोद्योगाचा, वस्त्रनिर्मितीकलेचा विकास कसा होत गेला ते विकासाचे टप्पे, भारतीय वस्त्रोद्योगाचे आजवरचे स्वरूप त्याची वैज्ञानिक-तांत्रिक प्रगती, महाराष्ट्राचे या उद्योगामधील स्थान, होऊ घातलेले जागतिकीकरण या सर्वांचा साकल्याने विचार या कोशात करण्यात आला आहे. मराठीच्या आणि महाराष्ट्राच्या संदर्भात वस्त्रोद्योगाला प्राचीन काळापासून महत्त्वाचे स्थान आहे, परंतु, या विषयासंबंधी फारच थोडे दर्जेदार लिखाण मराठी भाषेत उपलब्ध आहे. ही त्रुटी दूर करण्यासाठी सर्वसामान्य जिज्ञासूला समजेल अशी माहिती या कोशात देण्यात आली आहे. या माहितीकोशाचे एकूण नऊ खंड संकल्पित असून आतापर्यंत चार खंडांचे प्रकाशन झाले आहे. पाचवा खंड प्रकाशनाच्या मार्गावर आहे. खंड 1 - तंतुनिर्माण व तंतुविज्ञान, खंड 2 - सूतनिर्माण, खंड 3 - कापडनिर्माण, खंड 4 - रासायनिक प्रक्रिया. खंड 5 - फॅशन व वस्त्रप्रावरणे, खंड 6 - तंत्रोपयोगी वस्त्रे, खंड 7 - वस्त्रोद्योग व्यवस्थापन, खंड 8 - वस्त्र संकल्पनेचा सांस्कृतिक अविष्कार आणि खंड 9 - वस्त्रोद्योग परिभाषाकोश.

**(4) मराठी ग्रंथसूचिमाला (1951-2000) :** शं. ग. दाते यांनी सन 1950 पर्यंतच्या मराठी ग्रंथांची विषयवार सूची दोन भागांत तयार केली होती. ही सूची बरीच वर्षे अनुपलब्ध असल्याने तिचे नवीन परिशिष्टांसह पुनर्मुद्रण संस्थेमार्फत करण्यात आले होते. इ. स. 1950 नंतर मराठीमध्ये प्रकाशित झालेल्या ग्रंथांची एकत्रित अशी विषयवार ग्रंथसूची उपलब्ध नसल्याने राज्य मराठी विकास संस्थेने 'मराठी ग्रंथसूचीमाला' हा प्रकल्प हाती घेतला असून त्याअंतर्गत इ. स. 1951 ते 2000 या कालखंडातील मराठी ग्रंथांची विषयवार सूची करण्यात येत आहे. आतापर्यत या मालेतील चार भाग - भाग 3 (1951-1962), भाग 4(1963-1970), भाग 5 (1971-1978) आणि भाग 6 (1979-1985) - प्रकाशित करण्यात आले आहेत. इ. स. 2000 पर्यंतच्या कालखंडातील ग्रंथांची नोंद करणाऱ्या पुढील भागांचे काम चालू आहे.

**(5) वाराणसी (बनारस) येथील मराठी भाषेचा सांस्कृतिक व समाजभाषावैज्ञानिक अभ्यास** : भारतातील इतर राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात जेथे मराठी समाज आहे, त्यांचा सांस्कृतिक व समाजभाषावैज्ञानिक अभ्यास करून त्यांची भाषा व संस्कृती यांच्या सद्यस्थितीचा संशोधनात्मक आढावा घेऊन त्या माहितीचा उपयोग बहुउद्देश पद्धतीने करणे असे या प्रकल्पाचे स्वरूप आहे. या प्रकल्पांतर्गत वाराणसी येथे बोलली जाणारी मराठी भाषा व प्रमाण मराठी भाषा यांतील फरकाचा समाजभाषावैज्ञानिक अभ्यास करणे अपेक्षित असून वाराणसीमधील भाषिकांची प्राथमिक पाहणी, भाषिकांची एकूण संख्या, स्त्री-पुरुष,

वयोगटाप्रमाणे (लोकसंख्या) इ. माहिती मिळविणे, काही निवडक भाषकांच्या भाषिक नमुन्यांचे ध्वनिमुद्रण करणे, येथील मराठी भाषकांशी संपर्क साधून ठरविलेली संशोधनाची साधने वापरून भाषिक नमुने व माहिती मिळवणे, गोळा केलेल्या भाषिक नमुन्यांच्या माहितीचे विश्लेषण करणे, सर्व संकलित माहितीचे मराठीत लेखन करून मांडणी करण्याचे काम पूर्ण झाले आहे. तज्ञांकडून त्याचे मुल्यमापन करण्याचे काम सुरु आहे.

**(6) मराठी उत्तमोत्तम साहित्यकृतींची श्राव्य पुस्तके (ऑडिओ सीडीज) :** या प्रकल्पांतर्गत मराठीतील प्रसिद्ध निवडक संतसाहित्य तसेच ज्ञानपीठ पारितोषिक विजेत्या साहित्यिकांचे साहित्य, साहित्य अकादमी पारितोषिक विजेते साहित्य व महाराष्ट्र शासन पारितोषिक विजेते निवडक साहित्यकृतींची श्राव्य पुस्तके तयार करण्यात येणार असून, आतापर्यंत कृष्णाकाठ (स्व. यशवंतराव चव्हाण यांचे आत्मचरित्र) व श्री दासबोध (श्री समर्थ रामदास कृत) या ग्रंथांची श्राव्य पुस्तके तयार करण्यात आली असून ती संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत. तसेच त्यांच्या ऑडिओ सीडीही संस्थेच्या कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत. ज्ञानपीठ पुरस्कार विजेते मराठीतील ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज आणि विंदा करंदीकर यांचे अनुक्रमे रसयात्रा व प्रवासी पक्षी आणि संहिता व आदिमाया ह्या कवितासंग्रहांची श्राव्य पुस्तके संस्थेच्या संकेतस्थळावर जनतेसाठी विनामूल्य उपलब्ध करण्यात आली आहेत.

**(7) मोडी हस्तलिखितांचे मराठी भाषेत रुपांतरण व विषयसूची खंड तयार करणे** : तमिळ विद्यापीठ, तंजावर येथील मोडी हस्तलिखितांचे मराठी भाषेत रुपांतरण करण्याचा प्रकल्प संस्थेने माहे मार्च 2013 मध्ये तमिळ विद्यापीठ, तंजावर यांच्याबरोबर करार करून सुरू केलेला आहे. या प्रकल्पांतर्गत अतिमहत्त्वाच्या पाच लाख मोडी हस्तलिखितांचे जतन व संवर्धन करण्यासाठी पूर्वतयारी म्हणून त्यांची साफसफाई, दुरुस्ती करून त्यांची विषयाप्रमाणे सूची (कॅटलॉग) तयार करणे, ती कागदपत्रे संगणकावर (डिजिटायजेशन) आणणे व त्या कागदपत्रांचे मराठीमध्ये रुपांतरण करून ते प्रकाशित करणे असे या प्रकल्पाचे स्वरूप आहे. यातील पाच लाख हस्तलिखित कागदपत्रांची साफसफाई करणे, कादपत्रांच्या घड्या काढणे, फाटलेली व जीर्ण झालेली हस्तलिखिते दुरुस्ती करणे इ. कामे पूर्ण झालेले असून या कागदपत्रांची संगणकावर पाच लक्ष इमेजेस/फ्रेम्स तयार करण्यात आली आहेत. उर्वरित कागदपत्रे संगणकीकृत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

**(8) अमराठी भाषकांसाठी उपक्रम** : ह्या प्रकल्पाचे पुढील दोन भाग आहेत. **अमराठी भाषकांसाठी प्रकाशने** ह्या पहिल्या भागांतर्गत अमराठी भाषकांना मराठी भाषेचे ज्ञान करून देण्यासाठी पाठ्यपुस्तके, शब्दकोश इ. निर्माण करणे तसेच इतर प्रकाशने निर्माण करणे आणि दुसऱ्या भागांतर्गत **दैनंदिन व्यवहारात उपयोगी पडेल असे मराठी भाषेचे शिक्षण** देणे अभिप्रेत आहे. या दृष्टीने मुंबई विद्यापीठाच्या जर्मन विभागाने हाती घेतलेल्या "माय मराठी" प्रकल्पामध्ये राज्य मराठी विकास संस्थेने सक्रिय सहभाग

घेतला आहे.  3 वर्षात 6 पातळ्यांची  पुस्तके तयार होणार असून  अमराठी भाषकांना वैज्ञानिक दृष्टीने अध्यापन कसे करता येईल याचा विचार त्यात केला आहे.

(अ) राज्य मराठी विकास संस्थेला दिनांक 15.02.2015 रोजी मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन कडून तेथे कार्यरत असणाऱ्या अमराठी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मराठी संवाद-कौशल्यांचे प्रशिक्षण देण्याचा प्रस्ताव प्राप्त झाला होता. या प्रस्तावान्वये राज्य मराठी विकास संस्था आणि मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन यांच्यात दिनांक 03 सप्टेंबर 2015 रोजी करार करण्यात आला. याहे प्रशिक्षण तीन टप्प्यात घेण्यात आले.या प्रशिक्षण वर्गांत मराठी शिकणाऱ्या अमराठी अधिकारी आणि कर्मचारी वर्गाकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे. भविष्यातही संस्था अशा प्रकारचे प्रशिक्षण वर्ग महाराष्ट्रात इतरत्र राबविण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे.

(ब) अमराठी विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी प्रशिक्षकांसाठी दिनांक 03.05.2016 ते दिनांक 12.05.2016 या कालावधीत मराठी प्रशिक्षणवर्ग कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेस उत्तम प्रतिसाद मिळाला.

(क) इस्त्रायल येथील तेल अविव विद्यापीठात अमराठी विद्यार्थ्यांना मराठी शिकविण्यासाठी राज्य मराठी विकास संस्था, तेल अविव विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ या तीन संस्थांमध्ये दिनांक 15.02.2016 रोजी करार झाला. या करारानुसार इस्त्रायल येथील तेल अविव विद्यापीठात दिनांक 04.07.2016 ते दिनांक 28.07.2016 या कालावधीत मराठी प्रशिक्षण वर्ग पार पडला. या वर्गास एकूण 22 प्रशिक्षणार्थींनी प्रवेश घेतला होता. यातील 28 ते 55 वर्षे वयोगटातील काही प्रशिक्षणार्थी बेने इस्त्रायली तर काही मूळचे इस्त्रायली होते. या वर्गास विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

**(9) संस्थेच्या प्रकाशनांचे ई-पुस्तक स्वरूपात रूपांतर करण्याचा प्रकल्प :** संगणकीय क्रांतीमुळे उपलब्ध झालेल्या नव्या साधनांवर संस्थेची प्रकाशने उपलब्ध व्हावीत ह्या हेतूने संस्थेच्या काही प्रकाशनांचे इ-बुक स्वरूपात रूपांतर करण्याचे काम संस्थेने हाती घेतले आहे. संस्थेची ही प्रकाशने इ-पब, पीडीएफ अशा विविध संगणकीय पुस्तक स्वरुपांत उपलब्ध  होत आहेत. सध्या संस्थेची 10 प्रकाशने इ-पुस्तक स्वरूपात संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**(10) मराठी दुर्मिळ ग्रंथांचे संगणकीकरण :** आजवर प्रकाशित झालेल्या मराठी ग्रंथांपैकी ज्यांच्या स्वामित्व हक्काची मुदत संपली आहे, असे मराठी भाषेतील दुर्मिळ ग्रंथ आणि नियतकालिके ह्यांचे संगणककीकरण करून ते महाजालावर जनतेसाठी उपलब्ध करून देण्यात यावेत, अशी  तरतूद महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण 2010 मध्ये करण्यात आली आहे. त्यानुसार मराठी भाषा, संस्कृती, साहित्य आणि समाजजीवन ह्यासंदर्भातील ऐतिहासिक ठेवा जतन करण्याच्या हेतूने मराठीतील दुर्मिळ पुस्तके आणि नियतकालिके ह्यांचे संगणकीकरण (डिजिटायजेशन) करून ते जनतेला उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.सद्य:स्थितीत राजय मराठी विकास संस्थेकडून 956 दुर्मिळ ग्रंथांची सूची

तयार करण्यात आली असून आतापर्यंत 103 पुस्तके व विविध नियतकालिकांचे 357 सुटे अंक (239 बांधीव खंड - बांधीव खंडात एकाहून अधिक सुटे अंक असतात) उतरवून घेण्यासाठी (डाऊनलोड करण्यासाठी) सध्या संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

**(11) विधिशास्त्र संज्ञा - संकल्पना कोश** : विधि व न्याय व्यवहारात वापरल्या जाणाऱ्या संज्ञा - संकल्पना सर्वसामान्य जनतेस कळण्यास मदत व्हावी, हा मुख्य उद्देश असलेला विधिशास्त्र संज्ञा-संकल्पना कोश तयार करण्याचे नियोजित असून अधिवक्ता श्री. शांताराम दातार हे या कोशाचे प्रमुख संपादक व समन्वयक असणार आहेत. ठाणे महानगरपालिका विधि महाविद्यालय यांच्या सहकार्याने हा प्रकल्प राबविण्यात येत आहे.

**(12) ऑलिम्पिक माहितीकोश :** मराठीमध्ये ऑलिम्पिक स्पर्धांविषयी माहिती देणारी पुस्तके आहेत. परंतु, माहितीकोशाच्या धर्तीवरचा एकही कोश उपलब्ध नाही. त्यामुळे शाळा-महाविद्यालये यांना उपयुक्त ठरेल असा माहितीकोश तयार करण्याचे संकल्पित असून श्री. हेमंत जोगदेव हे या माहितीकोशाचे प्रमुख संपादक असणार आहेत. ज्ञान प्रबोधिनी-क्रीडाकुल, निगडी आणि चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय (महाराष्ट्रीय मंडळ), पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. हा कोश ई-बूक स्वरुपात 18 महिन्यांच्या कालावधीमध्ये प्रसिद्ध करण्याचे नियोजन आहे.

**(13) संगणक आणि मराठी : संगणकावर मराठी साधनांचा मुक्त वापर होण्यासाठी मुक्त आणि व्यक्त स्वरुपाची साधन निर्माण करण्याचा राज्य मराठी विाकस संस्थेचा संकल्प आहे. त्या अंतर्गत लिनक्स-उर्बन प्रणालीचे मराठीकरण करण्याबरोबरच अन्यही आवश्यक साधनांचे मराठीकरण करायचे आहे.**

**01. गिम्प (GIMP) : संगणकीय प्रतिमा संपादनासाठीची आज्ञावली (फोटोशॉपचा मुक्त पर्याय)**

**02. इंकस्केप (Inkscape) : संगणकीय संदिश-प्रतिमा-संपादनाची अज्ञावली (कोरल-ड्रॉचा मुक्त पर्याय)**

**03. ग्नू-कॅश (GunCash) : लेखाविषय अज्ञावली (टूलीशी समकक्ष)**

**04. स्क्रायबरा (Scribus) : अक्षरजुळणीची आज्ञावली (पेजमेकर व इनडिझाइनचा मुक्त पर्याय) सध्या ह्या आज्ञावलीत देवनागरी मजकून नीट दिसत नाही. पण आज्ञावली मुक्त असल्याने तीत सुधारणा करणे शक्य आहे.**

**05. सिजिल (sigil) इ-ब स्वरुपाती इ-पुस्तके तयार करण्याची आज्ञावली**

**06. केडेनलाइव्ह (kedenlive) मुक्त सलंच्चित्रसंपादक**

**07. ऑडेसिटी (Audacity) मुक्त श्राव्यफीत-संपादक**

**08. फॉन्टफोर्ज (FontForge) टंकसंपादनाची आज्ञावली**

**09. लिब्रेकॅड (LibreCAD) आरेखनाची आज्ञावली (ऑटोकॅडचा मुक्त पर्याय)**

**10. लिब्रे ऑफिस (वर्ड, एक्सेल आणि पॉवरपॉइंट ह्यांचा मुक्त पर्याय)**

**यापैकी गिम्प या आज्ञावलीचा प्रस्ताव उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाकडून प्राप्त झाला असून त्याला प्रकल्प-वित्त समितीची मान्यता मिळालेली आहे.**

**(14) युनिकोड-आधारित मुक्त (फ्री अॅण्ड ओपन सोर्स) मराठी टंक तयार करणे :** राज्य मराठी विकास संस्थेने "यशोमुद्रा" आणि "यशोवेणू" हे दोन टंक संस्थेच्या संकेतस्थळावर (rmvs.maharashtra.gov.in.) विनामूल्य तसेच मुक्त (फ्री अॅन्ड ओपन सोर्स) स्वरुपात उपलब्ध करुन दिले आहेत. त्याचप्रमाणे संस्थेला योग्य ते श्रेय देऊन हे टंक वापरण्यास त्याची प्रत करुन घेण्यास, त्याची सर्व (तांत्रिक आणि ज्ञानात्मक) सामग्री पाहण्यास आणि अभ्यासण्यास, ह्या सामग्रीचा वापर करुन नवी सामग्री तयार करण्यास आणि योग्य त्या श्रेयनिर्देशासह जीपीएल -3 हया परवान्याअंतर्गत वितरीत करण्यास स्वामित्व हक्क धारक म्हणून राज्य मराठी विकास संस्थेने मान्यता दिली आहे.

**(15) पुस्तकांचे गाव : लोकसहभागातून साकारलेला पुस्तकांचं गाव हा नाविन्यपूर्ण प्रकल्प महाबळेश्वरजवळील भिलार या गावी कार्यन्वित करण्यात आला आहे. भिलार गावात घरे, लॉज, आणि शाळा, मंदिरे अशी सार्वजनिक ठिकाणे मिळून 25 जागा निवडण्यात आल्या आहेत. या एकूण 25 ठिकाणी पुस्तकांची साहित्यप्रकारनिहाय दालने ठेवण्यात आली आहेत. प्रत्येक घरात, पर्यटकांना पुस्तके व्यवस्थित पाहता येतील, चाळता येतील आणि प्रसंगी आरामात बसून वाचता येतील अशी व्यवस्था आहे.**

**(16) महाराष्ट्रातील मराठीच्या बोलींचे प्रतिमांकन :** डेकन कॉलेज, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील मराठीच्या बोलींचे प्रतिमांकन करण्याचा प्रकल्प सुरु झाला आहे. आगामी 3 वर्षात म्हणजे 2020 पर्यंत हा प्रकल्प पूर्ण करण्याचा मानस आहे. मराठीच्या बोलींचे लेखन, ध्वनिमुद्रण आणि आवश्यक तिथे चित्रमुद्रण असे या प्रकल्पाचे स्वरुप आहे.

**(17) मराठी भाषण लेखन आणि लेखन वाचन यंत्रणा/मराठीतील देवनागरी व मोडी लिपीसाठी ओसीआर (Optical Character Recognition) विकसित करणे/मुक्तस्त्रोत संगणकीय साधनांचे वितरण व प्रशिक्षण :** या विषयांच्या अनुषंगाने उद्भवणा-या गरजा व त्या पूर्ण करण्याच्या अनुषंगाने संस्थेच्या स्तरावर प्रस्तावित प्रकल्पांचा आराखडा निश्चित करण्यासाठी पुणे विद्यापीठ येथे संगणक आणि भाषा संस्करण क्षेत्रातील तज्ज्ञांची एकत्रित परिषद आयोजित करण्यात येणार आहे.

**(18) संगणकावर मराठीच्या वापराचे प्रशिक्षण :** या कार्यक्रमांतर्गत एकूण 4 कार्यशाळा घेण्यात आल्या आहेत. या विषयाबाबत इनस्क्रिप्ट की बोर्डचा प्रसार व प्रचार होण्यासाठी MSCIT च्या अभ्यासक्रमात संगणकावर "मराठी" या विषयाचा समावेश अनिवार्य करण्याबाबत संस्थेकडून प्रयत्न करण्यात येत आहेत.

**(19) अशोक केळकर यांचा मराठी इंग्रजी शब्दकोश_**: भाषा वैज्ञानिक डॉ. अशोक केळकर यांच्या अपूर्ण राहीलेल्या “द प्रोजेक्ट ऑफ कॉम्प्रेहेन्सिव्ह मराठी इंग्लिश डिक्शनरी” या प्रकल्पाचे काम पश्चिम विभागीय भाषा केंद्र (भारतीय भाषा संस्थान) पुणे व राज्य मराठी विकास संस्था यांच्या विद्यमाने पूर्ण करण्यात येणार आहे.

**(20) समांतर पाठयपुस्तक निर्मितीसाठी अनुदान** : सुहद मंडळ, पुणे या संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावानुसार, कर्णबधीर व अन्य दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी बालभारतीची समांतर पाठ्यपुस्तके तयार करण्यासाठी रु.9,75,000/- चे अनुदान देण्यात मान्यता देण्यात आली. ह्या प्रत्येकी 1000 पुस्तकांचे राज्यभरात मोफत वितरण करण्यात येणार आहे.

(21) **विवेक चरित्रकोश**:- **सर्वसामान्य माणसापर्यंत विविध क्षेत्रातील महनीय व्यक्तींची चरित्रे पोहोचविण्यासाठी विवेक साप्ताहिकाने हाती घेतलेल्या प्रकल्पाल आर्थिक बल देऊन हे सारे खंड पूर्ण करुन एक उत्तम प्रकल्प साकारण्याचे श्रेय राज्य मराठी राज्य मराठी विकास संस्थेला मिळणार आहे**.

--------------

## कर्मचारी विषयक गोषवारा
## Personnel Summary

| अ. क्र. | पदनाम | वेतनश्रेणी SCALE OF PAY | पदांची संख्या | DESIGNATION |
|---|---|---|---|---|
| **(अ) राजपत्रित (A) Gazetted** | | | | |
| 1. | संचालक | 37400-67000 (ग्रेड पे 8700) | 1 | Director |
| 2. | उप संचालक | 37400-67000 (ग्रेड पे 8700) | 1 | Dy. Director |
| 3. | वरिष्ठ संशोधन सहायक | 15600-39100 (ग्रेड पे 7600) | 1 | Senior Reasearch Assisant |
| 4. | प्रशासकीय अधिकारी | 15600-39100 (ग्रेड पे 6600) | 1 | Administrative Officer |
| 5. | कनिष्ठ संशोधन सहायक | 15600-39100 (ग्रेड पे 5400) | 1 | Junior Reasearch Assisant |
| 6. | लेखा अधिकारी | 9300-34800 (ग्रेड पे 4400) | 1 | Accounts Officer |
| 7. | कार्यासन अधिकारी | 9300-34800 (ग्रेड पे 4400) | 1 | Desk Officer |
| | **एकूण (अ)** | | **7** | **Total (A)** |
| **(ब) अराजपत्रित (B) Non-Gazetted** | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 8. | लघुलेखक (निम्नश्रेणी) | 9300-34800 (ग्रेड पे 4300) | 1 | Stenographer (L.G) |
| 9. | सहायक | 9300-34800 (ग्रेड पे 4200) | 3 | Assistant |
| 10. | लिपिक-टंकलेखक | 5200-20200 (ग्रेड पे 1900) | 2 | Clerk-Typist |
| 11. | रोखपाल | 5200-20200 (ग्रेड पे 1900) | 1 | Cashier |
| 12. | वाहन चालक | 5200-20200 (ग्रेड पे 1900) | 1 | Driver |
| | **एकूण (ब)** | | **8** | **TOTAL (B)** |
| **(क) वर्ग ड (C) Class D** | | | | |
| 13. | शिपाई | 4440-7440 (ग्रेड पे 1300) | 1 | Peon |
| | **एकूण (क)** | | **1** | **TOTAL (C)** |
| | **एकूण (अ + ब + क)** | | **16** | **GRANT TOTAL(A+B+C)** |

**कार्यक्रम क्रमांक-5**

## महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मराठी भाषा, साहित्य, संस्कृती व कला या क्षेत्रांमध्ये महाराष्ट्रास लाभलेला थोर वारसा जतन व संवर्धन करण्यासाठी आणि विविध विषयांवरील मूलभूत संशोधन व प्रकाशन यांना उत्तेजन देण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाने दिनांक 19.11.1960 रोजी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना केली. अशा तऱ्हेच्या मंडळाची मूळ संकल्पना महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतरावजी चव्हाण यांची होती. संपूर्ण भारतात राज्य पातळीवर स्थापन करण्यात आलेले साहित्य-संस्कृतीविषयक कार्य करणारे हे पहिलेच मंडळ होय. मंडळाचे पहिले अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे होते.

**मंडळाचे मुख्य उद्दिष्ट**

महाराष्ट्राची भाषा, साहित्य, संस्कृती आणि इतिहास हे विषय तसेच विज्ञान, आधुनिक तंत्रज्ञान, समाजविद्या यांच्या कक्षेत येणाऱ्या विषयांवर मराठीमध्ये ग्रंथरचना करण्यासाठी विविध वाङ्मयीन योजनांना चालना देणे, मदत करणे व अशा योजना मंडळाने स्वत: हाती घेणे हे साहित्य आणि संस्कृती मंडळाचे मुख्य उद्दिष्ट आहे. शासनाने मंडळाकडे सोपविलेली वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आणि आधुनिक महाराष्ट्राच्या वाङ्मयीन गरजा लक्षात घेऊन सुरुवातीपासूनच मंडळ मौलिक व बहुविध वाङ्मयीन निर्मितीसाठी कार्यरत आहे. ज्ञान आणि संस्कृतीच्या विकासासाठी साधनस्वरूप व आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान यातील अद्ययावत प्रगतीची माहिती देणारी, मूलभूत ज्ञान देणारी पुस्तके व अभिजात ग्रंथांची भाषांतरे स्वस्त किंमतीत मराठी वाचकांना उपलब्ध करून देण्यावर मंडळाने लक्ष केंद्रित केले आहे. मंडळाच्या साहित्य संवर्धनाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी मंडळामार्फत खालील योजना/उपक्रम राबविले जातात.

**(1) पुस्तक प्रकाशन उपक्रम : या** योजनेमध्ये शास्त्रीय (विज्ञान) ग्रंथमाला, उत्कृष्ट ग्रंथांचे भाषांतर, शास्त्रीय (विज्ञान ) ग्रंथमाला, महाराष्ट्राच्या इतिहासाशी संबंधित ऐतिहासिक कागदपत्रांचे संपादन व प्रकाशन, वैचारिक, समीक्षात्मक, चरित्रात्मक इत्यादि विषयांवरील ग्रंथ प्रकाशित केले जातात. तसेच मंडळाने प्रकाशित केलेल्या पुस्तकांचे मागणीनुसार पुनर्मुद्रणही केले जाते. सदर योजनेअंतर्गत आतापर्यंत 524 पुस्तके प्रकाशित केली आहेत. जिज्ञासू, चोखंदळ तसेच सामान्य वाचकांना कमीत कमी किंमतीत पुस्तके उपलब्ध करुन देणे हा या योजनेचा मुख्य हेतू आहे.

(अ) उत्कृष्ट ग्रंथांची भाषांतरे - मराठीतील व अन्य भाषांमधील विविध विषयांवरील अभिजात वाङ्मयाच्या ग्रंथांनी जगातील वैचारिक साहित्यात मोलाची भर घातली आहे. अशा मौलिक व महत्त्वपूर्ण ग्रंथांची भाषांतरे मराठी तसेच हिंदी आणि इंग्रजी भाषेत उपलब्ध करून देण्याचा या योजनेमागील उद्देश आहे. या योजनेअंतर्गत इंग्रजी, रशियन, फ्रेंच इत्यादि पाश्चात्य व संस्कृत, प्राकृत यांसारख्या भारतीय भाषांतून मंडळाने पुस्तके निवडली असून भाषांतरीत पुस्तके प्रकाशित करण्यात आली आहेत.

(ब) महाराष्ट्राचा इतिहास व त्यावर प्रकाश टाकणा-या ऐतिहासिक कागदपत्रांचे संपादन व प्रकाशन - महाराष्ट्राच्या इतिहासावर प्रकाश टाकणारी उपलब्ध नवीन साधने आणि साहित्य लक्षात घेऊन व अशा अद्ययावत साधनसामग्रीचा उपयोग करून आधुनिक इतिहास रचनेच्या तत्त्वानुसार महाराष्ट्राचा प्रमाणभूत असा सुलभ राजकीय, सांस्कृतिक इतिहास मराठी भाषेत नव्याने संपादित/ प्रकाशित करण्यात येते. प्रागैतिहासिक काळापासून आधुनिक काळापर्यंत साधारणत: प्रत्येकी 500 पृष्ठांच्या 5 खंडात म्हणजे (1) प्राचीन कालखंड, (2) मध्ययुगीन कालखंड, (3) मराठा कालखंड भाग-1, शिवकाल, (4) मराठा कालखंड भाग-2 पेशवेकाळ व (5) आधुनिक कालखंड अशा पाच भागांचा यात समावेश आहे. यापैकी प्राचीन कालखंड भाग-1, मध्ययुगीन कालखंड भाग-1 (खंड-1 व 2), मराठा कालखंड भाग-1 (शिवकाळ) व मराठा कालखंड भाग-2, (पेशवेकाळ) हे चार खंड प्रकाशित झाले आहेत. आधुनिक कालखंडाच्या लेखनाचे काम डॉ. के. के. चौधरी यांनी पूर्ण केले असून सदर आधुनिक कालखंडावरील 'आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास' या पुस्तकाचे दोन्ही खंड छपाईसाठी शासकीय मुद्रणालयास सोपविण्यात आले आहेत.

(क) मंडळाची वैचारिक, समीक्षात्मक, चरित्रात्मक स्वरुपाची अन्य प्रकाशने - खाजगी प्रकाशकांमार्फत साधारणत: जी पुस्तके प्रकाशित करण्यास नकार दिला जातो, अशी पुस्तके जिज्ञासू, चोखंदळ तसेच वाचकांस वाजवी किमतीत उपलब्ध करून देण्यात येतात. मराठीतील प्रतिभावंत साहित्यिकांच्या सहित्याचे पुनर्मुद्रण तसेच समाज-परिवर्तन घडविण्यास मदत होऊ शकेल असे थोर विचारवंतांचे वाङ्मय, असामान्य व्यक्तिंची चरित्रे वगैरे प्रकाशित करण्यात येतात. संपूर्ण गडकरी भाग- 1, महात्मा फुले समग्र वाङ्मय, लोकहितवादी समग्र वाङ्मय, आगरकर समग्र वाङ्मय खंड 1 ते 3,

आचार्य भागवतांचे संकलित वाङ्मय, प्रबोधनकार ठाकरे समग्र वाङ्मय खंड 1 ते 5, सांस्कृतिक महाराष्ट्र खंड 1 व 2, केशवसुतांची कविता (हस्तलिखिताची यथामूल आवृत्ती), नामदेवगाथा, भावार्थ रामायण, संत तुकाराम बुवांची गाथा (1950 मध्ये प्रकाशित केलेली) अशा प्रकारची पुस्तके प्रकाशित केली आहेत.

(ड) महाराष्ट्राचे शिल्पकार उपक्रम - महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक व वैचारिक जडणघडणीत ज्या महनीय व्यक्तींनी भर घातली आहे, त्यांच्या जीवनकार्यावर आधारित साधारणत: शंभर ते सव्वाशे पानांची चरित्रे “महाराष्ट्राचे शिल्पकार” या योजनेंतर्गत पुस्तकरुपाने प्रकाशित करण्यात येतात. आतापर्यंत एकूण 45 महनीय व्यक्तींची चरित्रे प्रकाशित करण्यात आली आहेत.

**(2) ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान :** मराठीतील वैचारिक व शास्त्रीय विषयावरील ग्रंथांची उणीव लक्षात घेऊन लिहिलेल्या शास्त्रीय व तांत्रिक विषयावरील वैशिष्टयपूर्ण संशोधनात्मक अशा उच्च दर्जाच्या लेखनाचा तसेच ललित साहित्यातील वाङ्मयीन दृष्टीने गुणवत्तापूर्ण असलेल्या लेखनाचा विचार अनुदानासाठी केला जातो. महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाकडे मंडळाकडे पुस्तकाच्या प्रकाशनार्थ अनुदानासाठी व्यक्ती अथवा संस्थांकडून प्राप्त होणा-या पुस्तकाच्या प्रकाशन खर्चाच्या 75% इतके एकरकमी परंतु जास्तीत जास्त रु. 30,000/- च्या मर्यादेत अर्थसहाय्य केले जाते.

**(3) नवलेखक उत्तेजनार्थ अनुदान :**मराठी भाषेतील नवलेखकांना ललित वाङमयाच्या प्रकाशनासाठी उत्तेजनार्थ अनुदान देण्याची योजना महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळामार्फत दरवर्षी कार्यान्वित केली जाते. सदर योजना महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील फक्त मराठी नवलेखकांनाच लागू आहे. मंडळाकडे दरवर्षी काव्य, कथा, नाटक/एकांकिका, कादंबरी, ललित गद्य व बालवाङमयातील विविध प्रकारची हस्तलिखिते प्राप्त होतात. मंडळाच्या नवलेखक अनुदान समितीच्या बैठकीमध्ये मंडळाकडे प्राप्त हस्तलिखितांवरील अनुकूल/प्रतिकूल अभिप्रायांच्या अनुषंगाने दरवर्षी अनुकूल हस्तलिखितांना अनुदान देण्यासंदर्भात निर्णय घेतला जातो. दरवर्षी मंडळाकडे प्राप्त होणा-या हस्तलिखितांची संख्या कमीजास्त होण्याची शक्यता असते. मंडळाकडून प्रकाशनास अनुकूल ठरलेल्या हस्तलिखितांच्या प्रकाशनासाठी प्रकाशक प्रत्येक पुस्तकासाठी 25% रक्कम खर्च करतात व प्रकाशकांनी नवलेखकांची पुस्तके सुविहित पध्दतीने मंडळास छापून दिल्यानंतर उर्वरित 75% अनुदान दिले जाते. आतापर्यंत सदर योजनेअंतर्गत 2180 नवलेखकांची पुस्तके प्रकाशित करण्यात आली आहे.

**(4) नवलेखकांची चर्चासत्रे/कार्यशाळांना अनुदान :** नवलेखकांना ज्येष्ठ साहित्यिकांचे मार्गदर्शन व्हावे, त्यांच्या लेखनात सुधारणा व्हावी म्हणून महाराष्ट्रात विविध ठिकाणी नवलेखकांची चर्चासत्रे/कार्यशाळा आयोजित केल्या जातात. यामध्ये दरवर्षी 7 कार्याशाळा/चर्चासत्रे आयोजित केली जातात. याकरिता

प्रत्येकी रु. 50,000/- हजार अशी एकूण रु. 3,50,000/- इतकी रक्कम प्रदान करण्यात येते. महाराष्ट्रभर आतापर्यंत 92 चर्चासत्रे/कार्यशाळा यांचे आयोजन झाले आहे.

**(5) साहित्य संस्थांना अनुदान :** या अनुदान योजनेअंतर्गत शासनामार्फत मराठी साहित्य आणि संस्कृतीच्या विकासासाठी खालील 7 संस्थांना सध्या दरवर्षी देण्यात येणाऱ्या प्रत्येकी रु. 5.00 लाख इतक्या अनुदानात वाढ करुन सन 2018-19 पासून प्रत्येकी रु.10.00 लाख इतके अनुदान मंजूर करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

(1) अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ

(2) विदर्भ साहित्य संघ, नागपूर

(3) मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद

(4) महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

(5) मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई

(6) कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी आणि

(7) दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर.

**(6) अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास अनुदान :** अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ दरवर्षी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित करते. या संमेलनासाठी दरवर्षी रु. 25.00 लाख इतके अनुदान देण्यात येते.

**(7) नियतकालिकांना अनुदान** : विविध विषयांवरील मराठी भाषेत प्रसिध्द होणाऱ्या दर्जेदार व निकषास पात्र ठरणाऱ्याअशा सर्वसाधारणपणे 50-56 नियतकालिकांना प्रतिवर्षी अनुदान वितरित केले जाते.

**(8) महाराष्ट्राचे शिल्पकार योजना :** महाराष्ट्राची राजकीय , सामाजिक , शैक्षणिक , सांस्कृतिक, आर्थिक व वैचारिक जडणघडण होण्यामध्ये ज्या व्यकतींनी भर घातली आहे, त्यांच्या जीवनकार्यावर आधारित साधारणत: शंभर ते सव्वाशे पानांची चरित्रे महाराष्ट्राचे शिल्पकार या योजनेअंतर्गत पुस्तक रुपाने प्रकाशित करण्याची ही योजना आहे.

**(9) स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना :** यामध्ये अ) प्रौढ वाङ्मय विभागात 22 वाङ्मय पुरस्कार, ब) बालवाङ्मय विभागात 6 पुरस्कार, क) प्रथम प्रकाशन विभागात 6 पुरस्कार व ड) सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार असे एकूण 35 राज्य वाङ्मय पुरस्कार दरवर्षी मराठी भाषा गौरवदिनी प्रदान केले जातात.

सन 2016 चा स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाड:मय पुरस्कार साहित्यिक/लेखकांना-- जाहीर करण्यात आला आहे

**(10) ज्येष्ठ साहित्यिकास विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार : मराठी** साहित्य/वाङ्मय क्षेत्रात भरीव व मोलाची कामगिरी करणाऱ्या नामवंत ज्येष्ठ साहित्यिकांस कै. विंदा करंदीकर यांच्या नावे जीवन गौरव

पुरस्कार प्रदान करण्यात येतो. या पुरस्काराचे स्वरूप रु. 5,00,000/- (रुपये पाच लक्ष फक्त), मानचिन्ह व मानपत्र असे आहे.

सन 2017 चा विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार ---------------यांना जाहीर करण्यात आला आहे.

**(11) श्री. पु. भागवत पुरस्कार :** साहित्य निर्मिती क्षेत्रात लक्षणीय व उत्कृष्ट कार्य करणाऱ्या प्रकाशन संस्थेस मराठी प्रकाशन व्यवसायात मोलाचे कार्य करणारे श्री. पु. भागवत यांच्या नावे दरवर्षी पुरस्कार देण्यात येतो. या पुरस्काराचे स्वरूप रु. 3,00,000/- (रुपये तीन लक्ष फक्त), मानचिन्ह व मानपत्र असे आहे.

सन 2017 चा श्री. पु. भागवत पुरस्कार ------------------ या संस्थेस जाहीर करण्यात आला आहे.

**(12) अन्य मराठी साहित्य संमेलनाना अनुदान** : महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण 2010 नुसार अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळामार्फत दरवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाव्यतिरिक्त राज्यामधील आयोजित होणाऱ्या अन्य 15 मराठी साहित्य संमेलनांना प्रत्येकी दरवर्षी रु.2.00 लाखाचे अनुदान देण्यात येते.

**(13) मंडळाच्या ग्रंथांचे ई-बुक** - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने मराठी भाषा, संस्कृती, विज्ञान, आधुनिक तंत्रज्ञान व समाजविद्या यासारख्या विविध विषयांवर आजमितीपर्यंत 524 ग्रंथ प्रकाशित केले आहेत. त्यापैकी 444 पुस्तके ई-बुक करण्यासाठी सी-डॅक, पुणे या संस्थेकडे सोपविण्यात आली आहेत. सदर काम मार्च 2018 अखेर पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

**(14) नाट्यसंज्ञा कोश :** 'नाटक' या वाङ्मय प्रकाराच्या आकलनासाठी, विश्लेषणासाठी आणि मूल्यमापनासाठी वापरल्या जाणाऱ्या संज्ञा सदर ग्रंथात समाविष्ट करण्यात येणार आहेत. हा प्रकल्प प्रा. विलास खोले यांजकडे सोपविला असून मार्च 2018 अखेरपर्यंत सदर प्रकल्प पूर्ण करुन मंडळास सादर केला जाणार आहे.

**(15) मराठी नाटक आणि रंगभूमीचा समग्र इतिहास** : सदर प्रकल्पाच्या माध्यमातून मराठी नाटक आणि रंगभूमीचा समग्र इतिहास मंडळाच्या वतीने प्रकाशित करण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाचे लेखन काम प्रा. दत्ता भगत यांनी पूर्ण केले असून सदर प्रकल्प छपाईसाठी शासकीय मुद्रणालयास लवकरच सोपविण्यात येणार आहे.

**(16) महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतराचा इतिहास :** या प्रकल्पात आधुनिक महाराष्ट्राचे राजकीय स्थित्यंतर, आर्थिक स्थित्यंतर, सामाजिक स्थित्यंतर, शैक्षणिक स्थित्यंतर, धार्मिक स्थित्यंतर, सांस्कृतिक स्थित्यंतर, भाषा व्याकरण व साहित्यातील स्थित्यंतरे, विज्ञान व तंत्रज्ञान, माध्यम संस्कृती, क्रिडा संस्कृती, न्यायव्यवस्था, कायदा आणि सुरक्षा इत्यादी घटकातील स्थित्यंतरे या सर्व बाबींचा सर्वंकष आढावा घेण्यात येणार असून सदर प्रकल्प मंडळाच्यावतीने ग्रंथरुपाने प्रकाशित करण्यात येणार आहे.

सदर प्रकल्प लेखनासाठी ज्येष्ठ अभ्यासक श्री. रमेश वरखेडे यांजकडे दिनांक 16.04.2016 रोजीच्या सामंजस्य करारान्वये सोपविण्यात आला आला असून सदर प्रकल्प तीन वर्षाच्या कालावधीमध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे.

**(17) बृहद्ग्रंथांचे प्रकाशन करणे** : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून नाटयसंज्ञा कोश, महाराष्ट्राच्या दृश्यात्मक कला परंपरांचा आढावा, अक्षर बालवाडमय : संहिता शोध, महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक स्थित्यंतराचा इतिहास, महाराष्ट्रातील नाथ, महानुभाव, वारकरी, दत्त व अन्य संप्रदायांच्या मध्ययुगीन वाङ्मयातील अप्रकाशित व असंग्रहीत स्फुट कवितांचे प्रकाशन, नागेश विनायक बापट यांच समग्र वाङमय, मध्ययुगीन कालखंडातील जैन साहित्यातील दुर्मिळ व अप्रकाशित हस्तलिखित ग्रंथांचे संशोधन व प्रकाशन, होळकरशाहीचा समग्र इतिहास, मराठी बालसाहित्य : इतिहास लेखन आणि समीक्षा संपादन, मराठी वाङमयीन नियतकालिकांचा बृहद् इतिहास, मराठीतील राजकीय संवेदन: संकलन व चिकित्सा, ललित लेखनातील मूळ घटक आणि घाटांच्या चर्चेचा सम्यक अभ्यास, मराठी साहित्य आणि तत्वज्ञान- अनुबंधाची रुपरेषा, श्रीबाळकृष्ण नरहर भावे (बाळकोबा भावे) यांचा ब्रह्म विचार, भारतातील मध्ययुगीन आणि आधुनिक कलासंगीत परंपरेचा इतिहास ( इ.स. 1300 ते 1947), मराठी वाङमयीन नियतकालिकांतील  काव्य समीक्षा (स्वातंत्र्योत्तर कालखंड), वित्रपट माध्यमातील बदलते प्रवाह – भारतीय आणि जागतिक चित्रपटाचा तौलनिक अभ्यास, महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या स्वातंत्र्यपूर्व काळातील प्रकाशित चरित्रांचे पुनर्प्रकाशन महाराजाच्या दातृत्वाच्या अभ्यास, भारतीय शास्त्रीय नृत्य- एक अलौकिक परंपरा, महाराष्ट्राच्या वैचारिक परंपरेतील  साहित्यांचे इंग्रजी भाषांतर व संपादन (19 ते 20 वे शतक), सवातंत्र्योत्तर महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासात स्वयंसेवी संस्था- संघटनांचे योगदान व प्राच्यविद्या संशोधन : प्रेरणा, परंपरा आणि योगदान  यांसारखे महत्वपूर्ण बृहद्ग्रंथ प्रकाशित करण्याचे काम मंडळामार्फत सुरु आहे.

**(18) "एक भारत श्रेष्ठ भारत"** या केंद्र शासनाच्या योजनेंतर्गत सन 2016-17 च्या प्रथम वर्षात महाराष्ट्र राज्याची जोडी ओरिसा राज्यसोबत असून या मध्ये भाषिक व सांस्कृतिक देवाणघेवाण  संदर्भात राज्य पुरस्कार प्राप्त 5 पुस्तके उरिया भाषेत अनुवादीत करण्यात आली आहेत.

| अ.क्र. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव | अनुवादकाचे नाव |
|---|---|---|---|
| 1 | महाराष्ट्राची कुळकथा | डॉ. मधुकर ढवळीकर | श्रीमती मंजुलता मोहपात्रा |
| 2 | गावगाडा शतकानंतर | श्री. अनिल पाटील | श्रीमती सविता राऊत |
| 3 | गंमत शाळा (भाग-3) | श्री. राजीव तांबे | श्रीमती सविता राऊत |
| 4 | सर्वसाक्षी | श्रीमती संजिवनी खेर | डॉ. वासुदेव जोगळेकर |
| 5 | कैफियत | श्री. अनंत जातेगांवकर | डॉ. वासुदेव जोगळेकर |

-----------------------

## कर्मचारी विषयक गोषवारा
## Personnel Summary

| अ. क्र. | पदनाम | वेतनश्रेणी SCALE OF PAY | पदांची संख्या | DESIGNATION |
|---|---|---|---|---|
| **(अ) राजपत्रित (A) Gazetted** | | | | |
| 1. | सचिव | 15600-39100 ग्रेड पे 6600 | 1 | Secretary |
| | | **एकूण (अ)** | **1** | **Total (A)** |
| **(ब) अराजपत्रित (B) Non-Gazetted** | | | | |
| 2. | अधीक्षक | 9300-34800 ग्रेड पे 4300 | 1 | Superitendent |
| 3. | प्रपाठक | 9300-34800 ग्रेड पे 4300 | 1 | Reader |
| 4. | सहाय्यक लेखाधिकारी | 9300-34800 ग्रेड पे 4400 | 1 | Assistant Account Officer |
| 5. | उच्चश्रेणी लघुलेखक | 9300-34800 ग्रेड पे 4400 | 1 | Stenographar (H.G.) |
| 6. | अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक (निम्नश्रेणी लघुलेखक) | 9300-34800 ग्रेड पे 4300 | 1 | P.A. to Chairman [Stenographar (L.G.)] |
| 7. | वरिष्ठ लिपीक | 5200-20200 ग्रेड पे 2400 | 4 | Senior Clerk |
| 8. | ग्रंथालयीन सहाय्यक | 5200-20200 ग्रेड पे 2000 | 1 | Assistant Librarian |
| 10 | लिपिक-टंकलेखक | 5200-20200 ग्रेड पे 1900 | 7 | Clerk-Typist |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 11 | वाहनचालक | 5200-20200 ग्रेड पे 1900 | 1 | Driver |
| | | **एकूण (ब)** | **18** | **Total (B)** |
| **(क) वर्ग ड (C) Class D** | | | | |
| 12. | शिपाई | 4440-7440 ग्रेड पे 1300 | 2 | Peon |
| | | **एकूण (क)** | **2** | **Total (C)** |
| | | **एकूण (अ + ब + क)** | **21** | **Total (A+B+C)** |

**कार्यक्रम क्रमांक 6**

**महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ**

महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या वेळी राज्यकारभारासंबंधी मूलभूत धोरण सूचित करणारी काही सूत्रे सांगितली. त्या सूत्रांनुसार मराठी भाषा व साहित्य यांच्या अभिवृद्धीसाठी राज्य शासनाने दिनांक 19.11.1960 रोजी (कै.) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना केली. या मंडळाने जे अनेकविध उपक्रम सुरु केले, त्यापैकी एक प्रमुख व वैशिष्टयपूर्ण उपक्रम म्हणजे मराठी विश्वकोशाची निर्मिती हा होय.

दिनांक 01.12.1980 रोजी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे विभाजन होऊन मराठी विश्वकोशाच्या संपादन व प्रकाशन कार्यासाठी महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ या राज्यस्तरीय मंडळाची स्थापना झाली. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या निधनानंतर (दिनांक 27.05.1994) प्रा. मे. पु. रेगे, प्रा. रा. ग. जाधव, डॉ. श्रीकांत जिचकार व डॉ. विजया वाड यांनी विश्वकोशाचे अध्यक्ष व प्रमुख संपादक म्हणून काम पाहिले आहे. दिनांक 10.08.2015 पासून श्री. दिलीप करंबेळकर हे मंडळाचे अध्यक्ष व प्रमुख संपादक म्हणून काम पहात आहेत.

मराठी विश्वकोश हा सर्वविषयसंग्राहक ज्ञानकोश असून त्यात जवळ जवळ 100 पेक्षा अधिक महत्वाच्या मुलभूत ज्ञानशाखांतील हजारो विषयोपविषयांची सर्वांगीण पण सारभूत अद्ययावत माहिती लहान-मोठया लेखांच्या रुपाने प्रकाशित करण्यात आली आहे. मराठी विश्वकोशाचे 1 ते 20 खंड वर्णानुक्रमाने (अ ते ज ) प्रकाशित झाले आहेत.

**मराठी विश्वकोशाचे अद्ययावतीकरण :** कालौघानुसार सर्व विषय व ज्ञानशाखांमध्ये झालेले बदल व वाढ यांमुळे विश्वकोशातील अनेक नोंदीमध्ये सुधारणा तसेच काही अतिरिक्त नोंदी समाविष्ट करणे व अद्ययावतीकरणाचे हे काम कालमर्यादित स्वरुपात करणे आवश्यक बनले आहे. केलेले काम तितक्याच जलद गतीने जनतेपर्यंत पोहचविण्याकरिता माहिती व तंत्रज्ञानाची मदत घेऊन सर्व ज्ञानशाखांतील नोंदी संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. याकरिता विविध विद्यापीठे, शैक्षणिक व संशोधन संस्था इत्यादिंच्या सहकार्याने ज्ञानमंडळे स्थापन करुन त्यांच्या माध्यमातून मराठी विश्वकोशातील नोंदी अद्ययावत करण्याचे तसेच नवीन नोंदी समाविष्ट करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत विविध विषयांची 60 ज्ञानमंडळे स्थापन करण्याचे नियोजन असून यापैकी 37 ज्ञानमंडळे स्थापन होऊन त्यांचे काम सुरु झाले आहे.

मराठी विश्वकोशाचे संपादन कार्य हे विज्ञान व तंत्रविज्ञा, मानव्यविद्या, कला आणि प्रशासन अशा 4 शाखांमध्ये विभागलेले आहेत. ज्ञानविज्ञानाच्या सर्वच शाखांमध्ये कायमस्वरुपी तज्ज्ञ संपादन नेमणे शक्य नसल्याने विविध शाखांतील तज्ज्ञांच्या सवडीनुसार अभ्यागत संपादक म्हणून त्यांचे सहकार्य उपलब्ध करुन घेण्यात येते. वाई, जिल्हा सातारा येथे विश्वकोशाचे अद्ययावत ग्रंथालय असून त्यामध्ये सुमारे 50 हजारांहून अधिक संदर्भग्रंथ उपलब्ध आहेत. विश्वकोशाच्य मुद्रणासाठी वाई येथेच शासनाचे स्वतंत्र शासकीय मुद्रणालय स्थापन करण्यात आले आहे.

**विक्रीस उपलब्ध असलेली प्रकाशने :**

| | प्रकाशनाचे नाव | मूळ किंमत (रु.) | सवलतीची किंमत (रु.) |
|---|---|---|---|
| 1) | मराठी विश्वकोश खंड | 250/- | 175/- |
| 2) | 1 ते 17 खंडांच्या 6 सीडींचा संच | 1000/- | 700/- |
| 3) | कुमार विश्वकोश (जीवसृष्टी आणि पर्यावरण) खंड-2 भाग-1 | 500/- | 350/- |
| 4) | कुमार विश्वकोश (जीवसृष्टी आणि पर्यावरण) खंड-2 भाग-2 | 500/- | 350/- |
| 5) | मराठी-विश्वकोश 1 ते 20 खंड कार्ड- पेनड्राईव्ह | 800/- | -- |

6) विश्वकोशाचे सर्व खंड मोबाईल ॲपच्या स्वरुपात उपलब्ध

“मराठी विश्वकोश” हे भ्रमणध्वनी ॲप बुक गंगा डॉट कॉम या कंपनीकडून विकसित करण्यात आले असून त्याद्वारे विश्वकोशाच्या 1 ते 20 खंडातील सर्व नोंदी भ्रमणध्वनीवर आता एका क्लीकवर मोफत उपलब्ध करुन दिल्या आहेत. हे ॲप गुगल प्ले स्टोअरवर सहजरित्या उपलब्ध आहे.

**मंडळाचे आगामी उपक्रम :**

1) मराठी विश्वकोशाचे सातत्याने अद्ययावतीकरण व प्रकाशन.
2) कुमार विश्वकोश (जीवसृष्टी आणि पर्यावरण) भाग-3 चे प्रकाशन
3) कुमार विश्वकोश 1 ते 12 खंडांचे संपादन व प्रकाशन

4) मराठी विश्वकोश खंडांचे मुद्रण-विश्वकोश लेखन, समीक्षण, संपादन व प्रकाशनासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर.

---------------------------

## कर्मचारी विषयक गोषवारा
## Personnel Summary

| अ. क्र. | पदनाम | वेतनश्रेणी SCALE OF PAY | पदांची संख्या | DESIGNATION |
|---|---|---|---|---|
| | **(1) प्रशासकीय कार्यालय, मुंबई (1) Administative Office, Mumbai** | | | |
| **(अ) राजपत्रित (A) Gazetted** | | | | |
| 1. | सचिव (स.रा.से.वर्ग-1) | 15600-39100 ग्रेड पे 6600 | 1 | Secretary |
| **(ब) अराजपत्रित (B) Non-Gazetted** | | | | |
| 2. | अधिक्षक | 9300-34800 ग्रेड पे 4300 | 1 | Superitendent |
| 3. | सहाय्यक लेखाधिकारी | 9300-34800 ग्रेड पे 4400 | 1 | Assistant Account Officer |
| 4. | निम्नश्रेणी लघुलेखक | 9300-34800 ग्रेड पे 4300 | 1 | Lower Grade Stenographar |
| 5. | विद्याव्यासंगी सहायक | 9300-34800 ग्रेड पे 4400 | 1 | Vidya Vyasangi Assistant |
| 6. | स्वीय सहायक | 9300-34800 ग्रेड पे 4300 | 1 | Personal Assistant |
| 7. | वरिष्ठ लिपीक | 5200-20200 ग्रेड पे 2400 | 2 | Senior Clerk |
| 8. | लिपिक-टंकलेखक | 5200-20200 ग्रेड पे 1900 | 2 | Clerk-Typist |
| 9. | वाहनचालक | 5200-20200 ग्रेड पे 1900 | 1 | Driver |
| **(क) वर्ग ड (C) Class D** | | | | |
| 10. | शिपाई | 4440-7440 ग्रेड पे 1300 | 2 | Peon |
| | | **एकूण (1)** | **13** | **Total (1)** |
| | **(2) वाई कार्यालय (2) Wai Office** | | | |
| **(अ) राजपत्रित (A) Gazetted** | | | | |
| 1. | सहायक सचिव (स.रा.से.वर्ग-2) | 9300-34800 ग्रेड पे 4400 | 1 | Assistant Secretary |
| **(ब) अराजपत्रित (B) Non-Gazetted** | | | | |
| 2. | विद्याव्यासंगी सहायक | 9300-34800 ग्रेड पे 4400 | 7 | Vidya Vyasangi Assistant |
| 3. | संपादकीय सहायक | 5200-20200 ग्रेड पे 2800 | 7 | Editorial Assistant |
| 4. | ग्रंथालयीन सहायक | 5200-20200 ग्रेड पे 2000 | 3 | Library Assistant |
| 5. | लिपिक-टंकलेखक | 5200-20200 ग्रेड पे 1900 | 5 | Clerk-Typist |
| **(क) वर्ग ड (C) Class D** | | | | |
| 6. | शिपाई | 4440-7440 ग्रेड पे 1300 | 4 | Peon |
| 7. | झाडूवाला हमाल | 4440-7440 ग्रेड पे 1300 | 1 | Sweeper-Cum-Hamal |
| | | **एकूण (2)** | **28** | **Total (2)** |
| | **(3) ठोक मासिक मानधन (3) Gross Monthly Honorarium** | | | |
| 1. | विभाग संपादक | 21000 | 2 | Section Editor |
| 2. | सहसंपादक | 14000 | 3 | Joint Editor |
| 3. | कला संपादक | 11000 | 1 | Art Editor |
| 4. | प्रमुख चित्रकार | 10000 | 1 | Chief Artist |
| 5. | प्रमुख मानचित्रकार | 11000 | 1 | Chief Draftsman |
| 6. | सहायक मानचित्रकार | 8500 | 1 | Assistant Draftsman |
| 7. | संदर्भ सहायक | 8000 | 1 | Reference Assistant |
| | | **एकूण (3)** | **10** | **Total (3)** |
| | | **एकूण (1 + 2 + 3)** | **51** | **Total (1 + 2 + 3)** |